दैनिक

जनप्रभात

सामाजिक परिवर्तनाचा बुलंद आवाज

मुख्य संपादक :- राहुल गजरे

कार्यकारी संपादक :- अवधूत शेंद्रे

जिथे गाव.. तिथे वार्ताहर..!

महाराष्ट्रात सातारा सांगली कोल्हापूर रायगड सिंधुदुर्ग

जिल्हा,तालुका,शहर आणि ग्रामीण भागामध्ये

पत्रकार /वार्ताहर,छायाचित्रकार आणि जाहिरातदार नेमनेआहेत.

दैनिक जनप्रभात सामाजिक परिवर्तनाचा बुलंद आवाज

या लोकप्रिय वृत्तपत्राकरिता महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्हा, तालुका, शहर आणि ग्रामीण भागात प्रतिनिधी नेमणे आहेत. इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा.

पात्रता
१. समाजसेवेची आवड
२. जनसंपर्क
३. स्मार्ट फोन असणे आवश्यक
४. सोशल मीडियाचा वापर करता येणे

7875613619,883006884

जॉईन झालेल्या प्रत्येक प्रतिनिधीना आय कार्ड आणि नियुक्ती पत्र दिले जाईल.

* (आष्टी) वर्धा * शुक्रवार, ६ फेब्रुवारी २०२६ * वर्ष ४ थे * अंक ९३ * पृष्ठ ६ * मूल्य ५.०० RNI NO : MAHAR/2022/82242

गृहनिर्माणासह पायाभूत विकासात कॅनडाचे सहकार्य राज्यासाठी महत्त्वपूर्ण ठरेल– मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

महाराष्ट्रातील पायाभूत सुविधांच्या विकासासाठी कॅनडाची भागीदारी

मुंबई, दि. 5 :
महाराष्ट्राच्या विकासात योगदान देण्यासाठी कॅनडा उत्सुक आहे.कॅनडियन इन्फ्रास्ट्रक्चर बँकेच्या सहभागातून गृहनिर्माण व पायाभूत क्षेत्रातील दोन महत्त्वाच्या प्रकल्पांमध्ये गुंतवणुकीद्वारे या सहकार्याची सुरुवात केली जाईल. कॅनडाच्या वित्तीय व तांत्रिक सहकार्यामुळे महाराष्ट्रातील पायाभूत विकासाला नवी दिशा मिळेल, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.मुख्यमंत्र्यांच्या 'वर्षा' निवासस्थानी कॅनडा इन्फ्रास्ट्रक्चर बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सेबास्टियन यांच्याशी दूरदृश्य प्रणालीद्वारे संवाद साधण्यात आला. यावेळी वित्त व नियोजन विभागाचे अपर मुख्य सचिव ओ. पी. गुप्ता, परिवहन विभागाचे अपर मुख्य सचिव संजय सेठी, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अपर मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर, कृषी विभागाचे अपर मुख्य सचिव विकासचंद्र रस्तोगी, नगरविकास विभागाचे अपर मुख्य सचिव असीम गुप्ता, एमएमआरडीएचे महानगर आयुक्त डॉ.संजय मुखर्जी, बृहन्मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त भूषण गगराणी, सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक विजय सिंगल, मुख्यमंत्र्यांचे प्रमुख आर्थिक व गुंतवणूक सल्लागार कौस्तुभ धवसे, अभिनेता अजिंक्य देव आणि अतुल गुप्ता उपस्थित होते.कॅनडा इन्फ्रास्ट्रक्चर बँकेच्या गुंतवणुकीसंदर्भात आठ प्रमुख मुद्द्यांवर आधारित सविस्तर सादरीकरण यावेळी करण्यात आले.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, राज्यात विविध पायाभूत विकास प्रकल्प सुरू आहेत. यासाठी आंतरराष्ट्रीय सहकार्याचा लाभ घेण्यात येणार आहे. म्हाडा तसेच मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या (एमएमआरडीए) महत्त्वाच्या उपक्रमांसाठी हे सहकार्य उपयुक्त ठरेल. प्राथमिक टप्प्यात दोन प्रकल्पांची निवड करून भागीदारीच्या दृष्टीने चर्चा केली जाईल, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.यावेळी डॉ. सेबास्टियन यांनी महाराष्ट्रातील पायाभूत विकासासाठी कॅनडाच्या वित्तपुरवठा साखळीच्या माध्यमातून विविध तांत्रिक व आर्थिक उपाययोजनांची एकत्रित अंमलबजावणी करण्यात येईल, तसेच आवश्यकतेनुसार जी-20 ऑफटेकसह उच्च दर्जाची 'ट्रिपल-ए' रेटेड विश्वासार्हता प्रदान करण्यात येईल, अशी वचनबद्धता व्यक्त केली.पायाभूत विकासासाठी गुंतवणुकीची वैशिष्ट्ये :रुपयांमध्ये निधीचे विनियमन :स्थानिक चलनात गुंतवणूक व यजमान देशातच निधीची पुनर्गुंतवणूक करण्याची तरतूद असून, त्यामुळे निधी परत पाठवण्याचा धोका राहणार नाही. हेजिंग किंवा स्वॅप प्रणालीची आवश्यकता भासणार नाही.वन-स्टॉप सोल्यूशन :सुरक्षित, एन्क्रिप्टेड वेब-आधारित व ऑनलाईन प्लॅटफॉर्मद्वारे कॅनडाशी संबंधित प्रकल्पांसाठी उद्योग, संसाधने, नेटवर्क आणि राज्य शासनाच्या प्रणालींशी जोडलेले सर्वसमावेशक 'वन-स्टॉप सोल्यूशन' उपलब्ध करून देण्यात येणार आहे.टर्न-की प्रकल्प अंमलबजावणी :राज्य शासन किंवा स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्रकल्पांसाठी निधी उपलब्धता, दीर्घकालीन परतफेडीची मुदत तसेच विमा संरक्षणाद्वारे जोखीम कमी करण्याची व्यवस्था करण्यात येणार आहे.तांत्रिक सहकार्य :प्रमुख प्रकल्प व्यवस्थापन, कार्यान्वयन व देखरेख प्रक्रियांमध्ये कॅनडाचे तांत्रिक सहकार्य लाभणार असून, स्थानिक भागीदारांच्या सहभागातून प्रकल्प प्रभावीपणे राबविण्यात येतील.

लेखा परीक्षा विभागातील पदोन्नतीबाबत अभ्यासपूर्ण प्रस्ताव सादर करावा-वित्त राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल



मुंबई, दि. ५ :
महाराष्ट्र स्थानिक निधी लेखा विभागातील पदोन्नतीबाबत अभ्यासपूर्ण प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश वित्त राज्यमंत्री - ॲड. आशिष जयस्वाल यांनी दिले.स्थानिक निधी लेखा परीक्षा विभागात कनिष्ठ लेखा परीक्षक संवर्गातील पदोन्नतीचे प्रमाण सरळ सेवेने १:५ असे आहे. त्यामुळे पदोन्नतीच्या संधी खुपच कमी असल्याने हे प्रमाण १:४ करण्याची मागणी महाराष्ट्र स्थानिक निधी लेखा कर्मचारी संघटनेच्या वतीने वित्त राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल यांच्याकडे करण्यात आली. मंत्रालयात महाराष्ट्र स्थानिक निधी लेखा कर्मचारी संघटना, मुंबईचे अध्यक्ष विकास जाधव, सचिव रामदास नागरगोजे आणि संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी वित्त राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल यांची भेट घेऊन मागण्या मांडल्या.या पार्श्वभूमीवर कनिष्ठ लेखापरीक्षक संवर्गामध्ये पदोन्नतीचे प्रमाण सरळसेवेतून ८४ टक्के, तर लिपिक टकलेखक संवर्गातून १६ टक्के भरण्यात येतात. सरळ सेवेतून पदोन्नतीचे प्रमाण १:५ असून या प्रमाणामुळे विभागातील अनुभवी कर्मचाऱ्यांना पदोन्नतीच्या संधी अत्यंत मर्यादित होत आहेत. त्यामुळे कर्मचाऱ्यांच्या सेवाज्येष्ठतेवर अन्याय होत असल्याने, हे प्रमाण १:४ करण्याची मागणी मांडण्यात आली.लिपिक टंकलेखक, कनिष्ठ लेखापरीक्षक आणि वरिष्ठ लेखापरीक्षक अशी पदोन्नतीची साखळी आहे. कनिष्ठ लेखापरीक्षक संवर्गाचे सरळ सेवा व पदोन्नतीचे प्रमाण १:४ केले असता कोणताही संवर्ग ठप्प किंवा एकाच वेळी रिक्तही होणार नाही. त्यामुळे संचालनालयास प्रशासकीय दृष्ट्या कोणतीही अडचण येणार नाही. सद्यस्थितीत गट क संवर्गातून गट ब संवर्गात जाण्यास कर्मचाऱ्यांना २३ ते २५ वर्षे लागतात.पदोन्नतीचे प्रमाण बदलले तरी एकूण मंजूर पदसंख्या किंवा शासनावर आर्थिक बोजा वाढणार नाही. उलट, विभागाच्या कार्यक्षमतेत वाढ होऊन लेखापरीक्षणाचे काम अधिक प्रभावीपणे पार पडेल, असे यावेळी संघटनेच्या वतीने स्पष्ट करण्यात आले. मुख्य लेखा परीक्षक संचालनालयाने सादर करण्याचे निर्देश मंत्री श्री जयस्वाल यांनी यावेळी दिले.

शेतकरी व पशुपालकांना केंद्रबिंदू ठेवून प्रदर्शनाची तयारी करा- पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे

परळीतील महापशुधन एक्स्पोच्या तयारीचा आढावा



मुंबई, दि. 5 :
राज्यातील शेतकरी व पशुपालकांना केंद्रबिंदू ठेवून बीड जिल्ह्यातील परळी वैजनाथ येथे 13 ते 15 फेब्रुवारी या कालावधीत 'महापशुधन एक्स्पो' हे प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे. त्या दृष्टिने या प्रदर्शनाच्या आयोजनाची तयारी करावी, असे निर्देश पर्यावरण व वातावरणीय बदल आणि पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी दिले.बीड जिल्ह्यातील परळी वैजनाथ येथे 13 ते 15 फेब्रुवारी या कालावधीत 'महापशुधन एक्स्पो' प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. या प्रदर्शनाच्या तयारीचा पशुसंवर्धन मंत्री श्रीमती मुंडे यांनी आढावा घेतला. यावेळी पशुसंवर्धन विभागाचे सचिव डॉ. रामास्वामी एन., पशुसंवर्धन आयुक्त डॉ. प्रविणकुमार देवरे, बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्यासह राज्यातील पशुसंवर्धन विभागाचे अधिकारी दूरदृश्यप्रणालीद्वारे उपस्थित होते.पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे म्हणाल्या की, सशक्त पशुधन हा उद्देश ठेवून या प्रदर्शनाचे आयोजन करण्यात यावे. राज्यातील शेतकरी व पशुपालकांना नवनवीन पशुधनाची, त्यांच्या निगराणीविषयक तसेच या क्षेत्रातील नवनवीन तंत्रज्ञानाची माहिती व्हावी, यासाठी महापशुधन एक्स्पो महत्त्वाचे ठरणार आहे. त्यामुळे शेतकरी व पशुपालकांच्या दृष्टिकोनातून प्रदर्शनाच्या आयोजनाची तयारी करावी. हे प्रदर्शन यशस्वी करण्यासाठी पशुसंवर्धन व जिल्हा प्रशासनाच्या अधिकाऱ्यांनी समन्वयाने कामे करावीत. या प्रदर्शनात जैविक शेती, पशुधनापासून होणारे लाभ याविषयी माहिती शेतकऱ्यांना मिळावी, यासाठी चर्चासत्रे आयोजित करण्यात यावीत.
पशुप्रदर्शनात 1500 पशु प्रदर्शीत करण्यात येणार आहेत. त्याशिवाय राज्य शासनाच्या कृषी, महिला व बालविकास यासह विविध विभागांचे माहितीपर स्टॉल असणार आहेत. तसेच बचतगटांचे स्टॉलही या ठिकाणी उभारण्यात येणार आहेत. प्रदर्शनास भेट देणाऱ्यांची संख्याही मोठी असल्याने या सर्वांची कोणतीही गैरसोय होणार नाही याची दक्षता घ्यावी. प्रदर्शनाचा परिसर स्वच्छ व सुरक्षित ठेवण्यात यावा. महिलांसाठी वेगळा कक्ष उभारून त्या ठिकाणी आवश्यक सुविधा व सुरक्षितता उपलब्ध असावी. प्रदर्शनात सहभागी होणाऱ्या पशुंच्या संरक्षणासाठी सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात यावेत. त्याशिवाय वैद्यकीय सुविधा कक्ष, रुग्णावाहिका, अग्निशमन यंत्रणा, पोलिस संरक्षण, स्वयंसेवक यांचीही नियुक्त करण्यात यावी, अशे निर्देश मंत्री पंकजा मुंडे यांनी यावेळी दिले.या प्रदर्शनात विविध जातींच्या पशुंचा समावेश असणार आहेत. त्यांच्यासाठी विशेष व्यवस्था, डॉग शोसह विविध प्राण्यांसाठी 40 प्रकारच्या स्पर्धा आयोजित करण्यात आल्या आहेत. या स्पर्धांचे योग्य मूल्यांकन करण्यात येऊन विजेत्यांना पारितोषिके देण्यात येणार आहेत. राज्यातील पशुंशिवाय परराज्यातील गुणवंत व दर्जेदार पशुपक्षी यांचेही प्रदर्शन होईल. याचे नियोजन करण्याचे निर्देशही त्यांनी यावेळी दिले. प्रदर्शनाच्या ठिकाणी रक्तदान शिबिर, अवयवदान संमती पत्र आदी सामाजिक उपक्रमही राबविण्यात येणार आहेत.महिला व विद्यार्थ्यांना पशुप्रदर्शन पाहण्यासाठी दुपारच्या वेळी विशेष वेळ ठेवण्यात यावा. तसेच राज्यातील पशुवैद्यकीय क्षेत्रातील विद्यार्थी, शेतकरी यांनाही निमंत्रित करण्यात यावे. राज्यातील विशेषतः मराठवाड्यातील लोकप्रतिनिधींनाही निमंत्रित करण्यात यावे, असेही त्यांनी यावेळी सांगितले. या प्रदर्शनास राज्यातील शेतकरी, पशुपालक, पशुवैद्यकीय क्षेत्रातील तज्ज्ञ, विद्यार्थी यांनीही उपस्थित रहावे, असे आवाहन पशुसंवर्धन मंत्री मुंडे यांनी यावेळी केले. पशुसंवर्धन आयुक्त देवरे यांनी प्रदर्शनाच्या तयारीची माहिती दिली. प्रदर्शनास येणाऱ्यांसाठी पार्किंगची व्यवस्था करण्यात आली असून पशुधन घेऊन येणाऱ्या वाहनांसाठीही वेगळी व्यवस्था करण्यात आली आहे.मुख्य सभास्थानी वीस हजार आसनक्षमता असणार आहे. त्याशिवाय पारितोषिक पात्र पशुधनांचे विशेष प्रदर्शन या ठिकाणी असणार आहे. तीन वेगवेगळ्या पेंडॉलमध्ये सुमारे 300 स्टॉलची व्यवस्था करण्यात आली आहे. या प्रदर्शनात पशुपालकांसमवेतच या क्षेत्रातील उद्योजकही सहभागी होणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.जिल्हाधिकारी जॉन्सन यांनीही प्रशासनाच्या वतीने करण्यात आलेल्या तयारीची माहिती दिली. प्रदर्शनात येणाऱ्या नागरिकांसाठी पहिल्या टप्प्यात वीस एसटी बसची व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच गर्दी नियंत्रण, आपत्ती व्यवस्थापन आदींची तयारी करण्यात आली आहे. स्वयंसेवक म्हणून 'एनसीसी'च्या विद्यार्थ्यांचे सहाय्य घेण्यात येणार आहे. प्रदर्शनात महिला व विद्यार्थ्यांचा सहभाग वाढावा यासाठी नियोजन करण्यात आले आहे. तसेच पोलीसांचे हेल्प डेस्क उभारण्यात येणार असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

जर्मनीच्या शिष्टमंडळाने महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटीला दिली भेट

मुंबई,दि.५ : जागतिकस्तरावर नाविन्यता परिसंस्था अधिकाधिक परस्परांशी जोडल्या जात आहेत या पार्श्वभूमीवर जर्मनीतील कार्लसुहे शहराच्या (City of Karlsruhe, Germany) प्रतिनिधीमंडळाने महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटीला दिलेली भेट ही महाराष्ट्र आणि जर्मनी यांच्यात नाविन्यताधारित विकासाबाबत वाढत असलेल्या सहकार्याचे द्योतक ठरली आहे.जर्मनीतील कार्लसुहे हे शहर अग्रगण्य तंत्रज्ञान व नाविन्यता केंद्र म्हणून ओळखले जाते. कार्लसुहे शहराच्या व्यवसाय विकास विभागाच्या पुढाकारातून आयोजित करण्यात आलेल्या या भेटीचा उद्देश स्टार्टअप्स, प्रगत उत्पादन (Advanced Manufacturing), कौशल्यविकास आणि धोरणाधारित उद्योजकता या क्षेत्रांमध्ये दीर्घकालीन सहकार्याच्या संधींचा शोध घेणे हा होता. या भेटीतील संवादादरम्यान दोन्ही भागातील स्टार्टअप परिसंस्थेच्या व्यापक चर्चा करण्यात आली.



तंत्रज्ञानाधारित उद्योगवाढ, औद्योगिक व उत्पादन क्षेत्रातील नाविन्यता, कौशल्यविकास तसेच उद्योजकतेसाठी सार्वजनिक धोरणांची भूमिका या विषयांवर सविस्तर विचारमंथन झाले. शाश्वतता, नाविन्यता प्रशासन आणि चर्चा करण्यात आली.महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटीचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. श्रीकांत पाटील यांनी भारत व जर्मनी सहकार्य अधिक बळकट करण्याची गरज अधोरेखित केली. भविष्यातील भागीदारी ही केवळ औपचारिक भेटींपुरती न राहता संयुक्त कार्यक्रम, सामायिक नाविन्यता उपक्रम आणि स्टार्टअप्स व सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांसाठी (MSMEs) अधिक सशक्त बाजारपेठ प्रवेशाच्या संधी निर्माण करणारी असावी, असे त्यांनी नमूद केले. तसेच महाराष्ट्रात नाविन्यता क्षमतेचा विकास करण्यासाठी राज्य नाविन्यता सोसायटी कडून दिल्या जाणाऱ्या सहाय्य, परिसंस्था उभारणी आणि आंतरराष्ट्रीय संलग्नतेबाबत त्यांनी माहिती दिली.जर्मन प्रतिनिधीमंडळाने कार्लसुहे येथील नाविन्यता मॉडेलविषयी माहिती देताना संशोधन संस्था, उद्योग, स्टार्टअप्स आणि स्थानिक प्रशासन यांच्यातील घनिष्ठ समन्वयावर भर दिला. अशा मॉडेल्समधून महाराष्ट्रासारख्या प्रदेशांना, जे नाविन्यता पायाभूत सुविधा बळकट करताना समावेशक आणि शाश्वत विकासावर लक्ष केंद्रित करत आहेत, महत्त्वाचे धडे घेता येऊ शकतात. ही बैठक दोन्ही परिसंस्थांमध्ये दीर्घकालीन धोरणात्मक भागीदारी उभारण्याच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल ठरली आहे. या चर्चांचे ठोस सहकार्यामध्ये रूपांतर झाल्यास,महाराष्ट्र आणि कार्लसुहे यांच्यातील संवाद आंतरराष्ट्रीय नाविन्यता सहकार्य, गुंतवणूक आणि सामायिक विकासासाठी एक आदर्श उदाहरण ठरू शकते.

राज्य निवडणूक आयुक्तांची 'राष्ट्रीय परिषद' २४ फेब्रुवारीला नवी दिल्लीत

मुंबई, दि. ५ : भारत निवडणूक आयोगाच्या (ECI) वतीने राज्य निवडणूक आयुक्तांची (State Election Commissioners – SECs) राष्ट्रीय परिषद २४ फेब्रुवारी २०२६ रोजी नवी दिल्लीतील भारत मंडपम येथे आयोजित करण्यात आली आहे. देशातील सर्व राज्ये व केंद्रशासित प्रदेशांतील राज्य निवडणूक आयुक्त या परिषदेला उपस्थित राहणार आहेत. विशेष म्हणजे, ही राष्ट्रीय परिषद २५ वर्षांहून अधिक कालावधीनंतर होत असून, यापूर्वी अशी परिषद १९९९ साली आयोजित करण्यात आली होती.या परिषदेचे अध्यक्षस्थान मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार भूषवणार असून, निवडणूक आयुक्त डॉ. सुखबीर सिंग संधू आणि डॉ. विवेक जोशी यांचीही प्रमुख उपस्थिती राहणार आहे.परिषदेत राज्य निवडणूक आयुक्तांसह त्यांचे कायदेशीर व तांत्रिक तज्ज्ञ सहभागी होणार असून, निवडणूक प्रक्रियेसंदर्भातील विविध विषयांवर आपले विचार मांडणार आहेत. याशिवाय भारत निवडणूक आयोगाचे सर्व ३६ राज्ये व केंद्रशासित प्रदेशांचे मुख्य निवडणूक अधिकारी (CEO) देखील या राष्ट्रीय परिषदेला उपस्थित राहणार आहेत.या परिषदेचा मुख्य उद्देश भारत निवडणूक आयोग आणि राज्य निवडणूक आयोगांमध्ये त्यांच्या-त्यांच्या कायदेशीर चौकटीत राहून निवडणूक प्रक्रिया व व्यवस्थापना बाबत समन्वय (synergy) अधिक मजबूत करणे हा आहे.परिषदेदरम्यान राज्ये व केंद्रशासित प्रदेशांतील मतदार पात्रतेसंबंधी निवडणूक कायदे, भारत निवडणूक आयोगाने सुरू केलेल्या ECINET या डिजिटल प्लॅटफॉर्मसह तांत्रिक नवकल्पना, तसेच ईव्हीएम (EVM) यांसारख्या विषयांवर सविस्तर चर्चा सत्रे आयोजित करण्यात येणार आहेत.भारत निवडणूक आयोग संविधान व देशातील कायदेशीर तरतुदींनुसार मतदार यादी तयार करणे व निवडणुका पार पाडण्याचा आपला व्यापक अनुभव या परिषदेत राज्य निवडणूक आयोगांशी सामायिक करणार आहे.राज्य निवडणूक आयोगांची स्थापना ७३ व्या व ७४ व्या घटनादुरुस्ती तरतुदींनुसार संबंधित राज्यांच्या कायद्यांद्वारे करण्यात आली असून, पंचायत व नगरपालिका संस्थांच्या निवडणुकांसाठी मतदार यादी तयार करणे तसेच निवडणुकांचे संचालन, दिशा व नियंत्रण ही जबाबदारी राज्य निवडणूक आयोगांवर सोपवण्यात आली आहे, अशी माहिती भारत निवडणूक आयोगाने एका प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली आहे.

संपादकीय...

कायद्याच्या हातांपलीकडचे!

कायद्याचा धाक साऱ्यांनाच वाटतो, असे नाही. तो काहींनाच वाटतो. इतर अतिविशेष असतात आणि कायद्याचे हात त्यांच्यापर्यंत पोहोचत नाहीत हेच खरेमहाराष्ट्रातील सत्ताधारी पक्षाचे मंत्री व आमदार यांच्या वागण्या-बोलण्याने मध्यंतरी चांगलाच गदारोळ माजला. त्याची सर्वत्र चर्चा झाली. एक मंत्री सभागृहात भ्रमणध्वनीवर एक खेळ खेळत आहेत, असा आरोप चित्रणासकट झाला. एका मंत्रिपुत्राच्या आईच्या नावाने डान्सबार परवाना आहे, याचाही उल्लेख झाला. एका मंत्र्याच्या मुलाने मालमत्तेच्या लिलावात घोटाळा केला, असाही आरोप झाला. यात फक्त पत्ते खेळणाऱ्या मंत्र्यांचा खातेबदल झाला; पण त्या मंत्र्यांची बडतर्फी झाली नाही. याशिवायच्या इतर प्रकरणांत तर तेही झाले नाही. एका आमदाराने आमदार निवासातील उपाहारगृहाच्या कर्मचाऱ्याला मारहाण केली. त्याचेही चित्रण होते. त्यावरून चांगलीच टीका झाली. मात्र, ही टीका झाल्यानंतरही त्या आमदाराला सदनात व सदनाबाहेर कुठल्याही कारवाईला सामोरे जावे लागले नाही. यापुढेही त्याला कुठल्याही कारवाईला सामोरे जावे लागणार नाही, असा मतप्रवाह आहे. त्या घटनेचे चित्रण झाल्यावरही गुन्हा दाखल झाला नाही. कदाचित चौकशी होणार असेल, किंवा प्रलंबित असेल. मात्र, उच्चपदस्थांच्या, सत्ताधाऱ्यांच्या गैरकृत्यांना आळा बसेल असे ठोस काही न केल्यामुळे समाजात चुकीचा संदेश गेला, हे लक्षात घ्यायला हवे.ही सारी प्रकरणे, घटना पाहिल्या तर, कायद्यासमोर सारे समान आणि कायद्याचे साऱ्यांना समान संरक्षण या तत्त्वाला बगल दिली गेली व ही अशी बगल दिली जाते. एरवी साधी किंवा गंभीर दुखापत, कामात अडथळे आणणे, हालचालीस प्रतिबंध करणे, अपाय करणे अशी कृत्ये ऐच्छिक किंवा मुद्दामहून केली असतील तर भारतीय न्यायसंहितेप्रमाणे त्यांस गुन्हे असे संबोधले जाईल. आमदार महोदयांनी उपाहारगृहात येऊन, तेथील कर्मचाऱ्याला मारहाण करून जमिनीवर पाडले, असे चित्रणात दिसले. 'हे जे चित्रण दिसते ते खरे नाही वा त्यातील व्यक्ती मी नाही' असे आमदार महोदयांनी म्हटले नाही. त्या कर्मचाऱ्याने तक्रार दिली की नाही, याने फरक पडत नसतो. वाहिन्यांवरील चित्रण पाहून स्थानिक पोलिसांनी तेथे जाऊन चौकशी आणि शहानिशा करणे, त्या कर्मचाऱ्याची दुखापत कशा प्रकारची आहे, याचा वैद्यकीय अहवाल प्राप्त करणे, पीडिताची जबानी नोंदवणे या अपेक्षित आणि स्वाभाविक बाबी असतात.आमदार महोदय याला अपवाद कसे ठरतात, हे आजवर उलगडले नाही. 'अदखलपात्र गुन्हा' अशी नोंद झाली असे कळते. याचा अर्थ आम्ही दखल घेणार नाही, पीडिताला वाटल्यास तो न्यायालयात खासगी तक्रार करू शकतो. दखलपात्र किंवा अदखलपात्र हा फैसला आम्हीच करणार, दुखापत साधी की गंभीर हेही आम्हीच ठरविणार; कारण आम्ही सत्ताधारी आहोत. तटस्थ, संवेदनशील, स्वतंत्र यंत्रणांना त्यांचे काम करू द्यायचे नाही व प्रकरण मिटले असे दाखवायचे. मग दिलगिरीलाही अर्थ राहत नाही. आमदार महोदय म्हणतात, की अन्नपदार्थांचा दर्जा चांगला नसेल व ते खराब, शिळा असतील तर मी पुन्हा असाच वागेन. अन्नपदार्थांच्या बाबतीत तेच सगळे निर्णय घेणार. या मग्रुरीला शिक्षा नसते असेच सामान्यांना वाटणार. मात्र, साधारण व्यक्तीने ही कृती केली असती तर त्याला व सगळ्यांनाच पोलिसी खाक्या दिसला असता. अशा साधारण व्यक्तीला कदाचित काही दिवस कोठडीत काढावे लागले असते. पीडित कर्मचाऱ्याने काय केले, वा करायचे ठरवले हे ज्ञात नाही. मुख्यमंत्र्यांकडून कडक पावले उचलली जातील, ही शाश्वती नाही. आमदाराला व मंत्र्यांना समज मिळाली, हेही नसे थोडके.मुख्यमंत्र्यांनी सदनातील आपल्या भाषणात लोकप्रतिनिधींच्या वागण्या-बोलण्याचे वाभाडे काढले; परंतु राज्याचे गृहमंत्री म्हणून पीडिताला संरक्षण देण्याचे आश्वासन त्यांनी दिले नाही. त्या पीडिताला गृहमंत्र्यांकडून किंवा त्यांच्या खात्याकडून दिलासा नाही. त्याच्या कायदेशीर अधिकारांचे भान नसणारे, त्याबाबत असंवेदनशील असणारे गृहखाते जनतेला आपले कसे वाटणार, हा खरा प्रश्न आहे. शासनाच्या व्यवहारात असा ठळक भेदभाव का दिसतो? कायद्याची अंमलबजावणी करताना सरकारचा विभाग हा सत्ताधारी किंवा विरोधी पक्षाचा नसतो, हे ध्यानात घ्यायला हवे.

लता मंगेशकर: किती हसाल? आता रडाच!

(6 फेब्रुवारी: लतादीदी मंगेशकर पुण्यस्मरण विशेष.)



स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू होते. त्यांनी जेव्हा लतादीदींच्या आवाजातील 'ए मेरे वतन के लोगों, जरा आँखों में भर लों पानी!' हे गाणे ऐकले, तेव्हा त्यांचे डोळे पाण्यांनी डबडबले होते. ज्यांचा शासनाने महाराष्ट्र भूषण व भारतरत्न सर्वोच्च नागरी पुरस्काराने गौरव केला आहे, अशा जादुई आवाजाच्या धनी गानसम्राज्ञीं लताजींच्या पावन चरणी श्रीकृष्णकुमार गोविंदा निकोडे गुरूजींच्या लेखरुपातील श्रद्धासुमने अर्पण करीत आहोत... संपादक. लता मंगेशकर भारतातील एक पार्श्वगायिका गायिका होत्या. त्या सर्वोत्कृष्ट भारतीय गायिकांपैकी एक होत्या. तसेच त्यांना 'भारतीय गानकोकिळा' म्हणतात. त्या भारताच्या हिंदी चित्रपटसृष्टीच्या ख्यातनाम गायक-गायिकांपैकी एक होत्या. हिंदी संगीतविश्वात त्यांना 'लता दीदी' म्हणून ओळखले जाते. लतादीदींच्या कारकीर्दीची सुरूवात इ.स.१९४२मध्ये झाली. ती कारकीर्द सहा दशकांपेक्षा अधिक काळ टिकून होती. त्यांनी ९८०पेक्षा अधिक हिंदी चित्रपटांची गाणी गायली. तर २०हून अधिक प्रादेशिक भारतीय भाषांमध्ये प्रामुख्याने मराठी गायन केले आहे. त्यांचे कुटुंब संगीतासाठी प्रसिद्ध असून सुप्रसिद्ध गायिका आशा भोसले, उषा मंगेशकर, मीना मंगेशकर आणि ख्यातनाम संगीतकार-गायक हृदयनाथ मंगेशकर ही त्यांची सख्खी भावंडे होत. लता मंगेशकरांचे वडील मास्टर दीनानाथ मंगेशकर हे मराठी नाट्यसंगीताचे प्रसिद्ध गायक होते. लतादीदी मंगेशकरांचा जन्म दि.२८ सप्टेंबर १९२९ रोजी मध्यप्रदेश- ब्रिटिश काळात सेंट्रल इंडिया एजन्सीच्या इंदूर शहरात झाला. त्यांचे पाळण्यातले नाव हृदया होते.



संकलन व सुलेखन -
श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजी.एक प्राणीप्रेमी.
रामनगर वॉर्ड, गडचिरोली.
फक्त व्हॉट्सॲप-
९४२३७१४८८३.

त्यांचे वडील पंडित दीनानाथ मंगेशकर हे शास्त्रीय गायक तसेच नाट्यकलावंत होते. लतादीदी आपल्या आई-वडिलांचे सर्वात ज्येष्ठ अपत्य होते. आशा, उषा, मीना आणि हृदयनाथ ही त्यांची लहान भावंडे आहेत. लतादीदींना संगीताचे धडे प्रथमतः आपल्या वडिलांकडूनच मिळाले. वयाच्या पाचव्या वर्षी त्यांनी वडिलांच्या संगीत नाटकांमध्ये बाल-कलाकार भूमिकेने कामाची सुरूवात केली. इ.स.१९४२मध्ये त्या अवघ्या १३ वर्षांच्या होत्या, तेव्हा वडील हृदयविकाराने मृत्यू पावले. तेव्हा त्यांचे एक आप्त तसेच नवयुग चित्रपट कंपनीचे मालक- मास्टर विनायक यांनी लतादीदींच्या परिवाराची काळजी वाहिली. त्यांनी लतादीदींना गायिका आणि अभिनेत्री म्हणून कामाचा प्रारंभ करून दिला. लतादीदींनी "नाचू या गडे, खेळू सारे मनी हौस भारी" हे सदाशिवराव नेवरेकरांनी बसवलेले गाणे वसंत जोगळेकरांच्या "किती हंसाल?" या मराठी चित्रपटासाठी गायले, पण हे गाणे चित्रपटातून वगळले गेले. मास्टर विनायकांनी त्यांना "नवयुगची पहिली मंगळागौर" या मराठी चित्रपटात एक छोटी भूमिका दिली. या चित्रपटात त्यांनी "नटली चैत्राची नवलाई" हे दादा चांदेकरांनी स्वरबद्ध केलेले गीत गायले. इ.स.१९४५मध्ये जेव्हा मास्टर विनायकांच्या कंपनी-कार्यालयाचे स्थानांतर मुंबईस झाले, तेव्हा लतादीदी मुंबईला आल्या. त्या उस्ताद अमानत अली खाँ- भेंडीबाजारवाले यांच्याकडून हिंदुस्तानी शास्त्रोक्त संगीत शिकू लागल्या. त्यांनी वसंत जोगळेकरांच्या "आपकी सेवा में" या हिंदी चित्रपटासाठी "पा लागूं कर जोरी" हे गाणे गायले. दत्ता डावजेकर हे त्या गाण्याचे संगीतकार होते. लतादीदी आणि आशादीदी यांनी मास्टर विनायकांच्या पहिल्या हिंदी चित्रपटात- बडी माँमध्ये नूरजहाँ सोबत छोट्या भूमिका केल्या. त्या चित्रपटात त्यांनी "माता तेरे चरणों में" हे भजन गायले. मास्टर विनायकांच्या दुसऱ्या हिंदी चित्रपटाच्या ध्वनिमुद्रणाच्या वेळेस लतादीदींची ओळख संगीतकार वसंत देसाई यांच्याशी झाली. इ.स.१९४७मध्ये भारताच्या फाळणीनंतर उस्ताद अमानत अलीखाँ भेंडीबाजारवाले यांनी नवनिर्मित पाकिस्तानला देशांतर केले, तेव्हा लतादीदी अमानत खाँ- देवासवाले यांच्याकडे शास्त्रोक्त संगीत शिकू लागल्या. उस्ताद बडे गुलामअली खान साहेबांचे शिष्य पंडित तुलसीदास शर्मांकडूनही त्यांना तालीम मिळाली. इ.स.१९४८मध्ये मास्टर विनायकांच्या मृत्यूनंतर संगीतकार गुलाम हैदरांनी लतादीदींना मार्गदर्शन केले. त्या काळात हिंदी चित्रपटांमध्ये नूरजहाँ, शमशाद बेगम आणि जोहराबाई-अंबालेवाली, यांच्यासारख्या अनुनासिक आणि जड आवाज असलेल्या गायिका जास्त लोकप्रिय होत्या. सुरूवातीला लतादीदी आपल्या गाण्यात तेव्हाच्या लोकप्रिय असलेल्या नूरजहाँचे अनुकरण करीत असत. परंतु नंतर त्यांनी स्वतःच्या गाण्याची एक आगळी शैली बनवली. त्या काळात हिंदी चित्रपटांतल्या गाण्यांचे गीतकार प्रामुख्याने मुस्लिम कवी असत. त्यामुळे गाण्यांच्या भावकाव्यात भरपूर उर्दू शब्द असत. एकदा सुप्रसिद्ध अभिनेता दिलीपकुमार यांनी लताजींच्या भारतीय हिंदी गाण्यातील मराठी उच्चारांसाठी तुच्छतादर्शक शेरा मारला, तेव्हा त्यांनी शफी नावाच्या मौलवींकडून उर्दू उच्चारांची अक्षरे गिरवून घेतली होती. लोकप्रिय चित्रपट महलचे ''आयेगा आनेवाला'' हे गाणे त्यांच्या कारकीर्दीला एक महत्त्वाचे वळण देणारे ठरले. या गाण्याचे संगीतकार खेमचंद प्रकाश होते, तर चित्रपटात गाणे अभिनेत्री मधुबालाने म्हटले होते. ग़ुलाम हैदरांनी लताजींची ओळख तेव्हा शहीद या हिंदी चित्रपटावर काम करीत असलेले निर्माते शशिधर मुखर्जींशी करून दिली. मात्र मुखर्जींनी लताजींचा आवाज अतिशय बारीक असल्याच्या बहाण्याने नाकारला. तेव्हा हैदरांचे थोड्या रागात उत्तर होते, "येणाऱ्या काळात निर्माते आणि दिग्दर्शक लताजींचे पाय धरतील आणि आपल्या चित्रपटांसाठी गाण्याची याचना करतील." त्यांनी लताजींना मजबूर या चित्रपटात ''दिल मेरा तोडा'' हे गाणे म्हणण्याची अमूल्य संधी दिली. लतादीदी मंगेशकर यांनी लिहिलेल्या लेखांचा संग्रह ग्रंथाली प्रकाशनाने सन १९९५च्या आसपासच्या वर्षी प्रसिद्ध केला होता. त्याचे संपादन मधुवंती सप्रे यांनी केले होते. पुढे हे पुस्तक मिळणे कठीण झाले. तेव्हा जयश्री देसाई यांच्या पाठपुराव्यामुळे मैत्रेय प्रकाशनने ''फुले वेचिता'' या नावाने ते पुस्तक पुनर्मुद्रित केले आहे. लतादीदींनी पहिली मंगळागौर या चित्रपटासाठी प्रथम पार्श्वगायन केले होते. आवाजाला ईश्वरी देणगी लाभलेल्या लतादीदी मंगेशकर यांना श्वसनाचा त्रास, न्युमोनिया व कोरोनाची लागण झाल्याने त्या अनेक दिवसांपासून रुग्णालयात दाखल होत्या. अशातच लतादीदींनी दि.६ फेब्रुवारी २०२२ रोजी ब्रीच कँडी रुग्णालयात चिरनिद्रा घेतली. त्यांचे कुटुंबीय, मित्रमंडळी व चित्रपटसृष्टी शोकसागरात बुडाली होती. संपूर्ण भारत देशावर शोककळा पसरली. त्यांच्या जाण्याने जनता हुंदके देऊन रडली होती.!!

लतादीदींना व त्यांच्या अविस्मरणीय स्मृतींना श्रद्धांजली अर्पूण विनम्र अभिवादन !!

पक्ष भंजन ..

बोलू लागे कुहु कुहू
आता माधुर्य कुजन
ताला सूरा जुळवता
होई शुध्द मनोरंजन

विरूद्ध जरी विचार
संघटित करे बहुजन
उद्‌भवे समस्यागंभीर
सोडून जाता स्वजन

भूकसर्वांस सत्तेचीचं
आयोजन सहभोजन
आवड जपून दुजांची
सु ग्रास मांडा व्यंजन

पंगती नसावे वितुष्ट
विचारे करे नियोजन
दुर्गंधी ना हो शब्दांत
सुवासिक दंत मंजन

पक्ष फुटी कैक वेळा
डोळ्याघातले अंजन
पुन्हा साधू फाटाफूट
सजून बसलेत दुर्जन

वैर भाव तंटा भांडणे
करा प्रथम विसर्जन
असेगरजेचे गठबंधन
नवे मित्र करू अर्जन

कुठल्यारांगेत आहेत
खरोखर साधुसज्जन
पक्ष एकजूट साधता
ना व्हावे रे पक्षभंजन

– हेमंत मुसरीफ पुणे
9730306996

अनुदान ..

अनुदान केले जमा
खचितउचित नावा
एक खात्यात येता
कळे अख्ख्यागावा

उठू लागे आरोळ्या
चला बँकेकडे धावा
प्रवाह वाहे जोरदार
वल्हवू लागतीनावा

आहोत आम्ही पात्र
शिस्तीत केला दावा
लाडकीभगिनी खुश
धन्यवाद तुला भावा

पात्रता ठरवली वैध
शांतता लाभो जीवा
भाजूनघ्यावी भाकर
तापलेला आहे तवा

वादळेशमू लागलीयं
उल्हसितझाली हवा
उपरे सारले बाजूला
गिळत होते जे खवा

ज्याचाहक्काचाघास
त्याचा त्यानेचं खावा
घुसखोरांवर कारवाई
कडक शब्दांत सुनवा


भलीअंमलबजावणी
योजनाअशीचं बनवा
चांगल्याकामाकरिता
पैशांचीनसते वानवा

– हेमंत मुसरीफ पुणे.
9730306996.

गौळ येथे ८ फेब्रुवारीला श्रीसंत गजानन महाराज प्रगटदिन व मुर्ती प्राणप्रतिष्ठा.!

गौळ,(वार्ताहर)

येथील श्री संत भदाजी महाराज व महादेवबाबा सच्चिदानंद खटेश्वर महाराज तपोभूमी मठ श्रीक्षेत्र गौळ येथे श्रीसंत गजानन महाराज प्रगटदिन व मुर्ती प्राणप्रतिष्ठा व प्रगटदिन महोत्सव रविवार ८ फेब्रुवारी २०२६ रोजी संपन्न होत आहे. शनिवार, दि. ७ फेब्रुवारी रोजीसायंकाळी संत गजानन महाराज मुर्तीची गावामधून शोभायात्रा व मिरवणुक काढण्यात येणार असून या मिरवणुकीत महीलामंडळ तथा गावातील नागरिक सहभागी होणार आहेत. रविवार, दि. ८ फेब्रुवारी रोजीपहाटे ५ वाजता मुर्ती प्राणप्रतिष्ठा व पुजा प्रारंभ होणार असून या पुजेचे यजमान शंकर बोंडे आहेत. यावेळेस ब्रह्मवृंद ह.भ.प. गणेश महाराज आकोटकर पुजाविधी करतील.दुपारी १०.३० ते १२.३० प्रगटदिन व काल्याचे किर्तनसंत सेवक रविंद्र महाराज विलायतकर विणेकरी दिव्य तेजतपोनिधी संत लोटांगण महाराज वारी परंपरा यांचे होणार असून गावातून भव्य मिरवणूक काढण्यात येणार आहे.त्यानंतर एकनिष्ठ गजानन भक्त, वर्धा व गौळ यांच्या तर्फे महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले असून रात्री ७ ते १० सुरसंगम संगित अभंगवाणी वर्धा यांचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.कार्यक्रमाच्या आयोजनाकरीता सर्व वारकरी भजनी मंडळ, गौळ नवयुवक तरुण-तरुणी सहकार्य करीत आहेत. या कार्यक्रमाचा पंचक्रोशीतल्या भक्तांनी लाभ घेण्याचे आवाहन महीलामंडळाकडून करण्यात येत आहे.



जनप्रभात हे दैनिक पत्र मालक, प्रकाशक, मुद्रक : संपादक राहुल ज्ञानेश्वरराव गजरे यांनी रुतुजा प्रिंटर, नवीन आष्टी ता.आष्टी जि.वर्धा ४४२२०२ येथे मुद्रीत करुन साप्ताहिक जनप्रभात कार्यालय, नवीन आष्टी ता. आष्टी जि.वर्धा ४४२२०२ येथे प्रसिध्द केले. भ्रमणध्वनी ७८७५६१३६१९ (या पत्रकातील सर्व माहितीशी संपादक, मालक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद वर्धा न्यायालयांतर्गत) RNI NO : MAHMAR/2022/82242

लोणी मध्ये डॉ. डि वाय पाटील विधी महाविद्यालय चे हिवाळी शिबिर

लोणी प्रतिनिधी (कैलास गायकवाड)



लोणी ता आंबेगाव येथे डॉ. डि वाय पाटील युनिटेक सोसायटीचे डॉ. डि वाय पाटील विधी महाविद्यालय, पुणे च्या राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या निर्देशा खाली लोणी येथे ७ दिवसाचे हिवाळी शिबीर ४ फेब्रुवारी २०२६ ते १० फेब्रुवारी २०२६ दरम्यान आयोजित केलेले आहे. शिबिरादरम्यान सामाजिक उपक्रमांचे तसेच श्रमदानाचे विविध उपक्रम आयोजित करण्यात येणार आहेत. गावातील स्मशानभूमीची स्वच्छता तसेच वनराई पद्धतीचे बंधारे, ग्रामसफाई , व्यसनमुक्तीचे पथनाट्य, विविध मान्यवरांचे व्याख्याने, विविध पटनाट्य व ग्राम कामकाज, वृक्षारोपण, वृक्षारोपण देखभाल व दुरुस्ती व इतर सेवाभावी काम करण्यात येणार आहे. पथनाट्याद्वारे जनजागृती मोहीम राबवण्यात येणार आहे. विविध मान्यवरच्या शिबिरास भेट देणार आहेत. घोडेगाव बार असोसिएशन चे माजी अध्यक्ष ऍड. निलेश शेळके, समाज भूषण कैलासराव गायकवाड जिल्हा परिषद शाळा लोणी चे व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष गौरव रोकडे सर, माजी उपसरपंच प्रकाश गायकवाड व इतर गावकरी शिबिराच्या उदघाटन प्रसंगी उपस्थित होते. शिबिराचे प्रमुख अर्जुन सोमवंशी सर व स्वाती मेहता यांच्या नियोजनाखाली शिबिर पार पडणार आहे.

बेल्हा जेजुरी महामार्गावर टेम्पोचा ताबा सुटल्याने अपघातात टेम्पो पलटी

लोणी प्रतिनिधी (कैलास गायकवाड)



लोणी ता आंबेगाव येथील बेल्हा जेजुरी महामार्गावर लोणी गावात कॅनरा बँकेसमोर उसाचे वाढे घेऊन भरधाव येणाऱ्या टेम्पो क्रमांक MH 04 G R 5928 चालकाचा गाडीवरील ताबा सुटल्याने कॅनडा बँकेच्या वळणावर उभ्या असलेल्या क्रेन M H 9 B U 0579 वरती जोरदार धडकल्यामुळे उसाचे वाढे वाहतूक करणारा टेम्पो पलटी झाला. इंजिन मधले ऑइल रस्त्यावरती संपूर्ण पसरले. टेम्पल चा चालक बचावला टेम्पो जर क्रेन ला अडकला नसता तर एक मोठा अपघात झाला असता . या बँकेच्या वळणावरती वाहतुकीच्या चिन्हांचे फलक बसवावेत व व स्पीड बेकर करावे अशी मागणी जनकल्याण पतसंस्थेचे उपाध्यक्ष प्रदीप कोचर, ग्रामपंचायत सदस्य मंगल गायकवाड व ग्रामस्थांनी केली आहे.

चाणजे पंचायत समिती गणातून अक्षय म्हात्रे विजयी होणार नागरिकांमध्ये चर्चा.

स्वच्छ, चारित्र्य संपन्न व उत्तम नेतृत्वामूळे निवडणुकीत मारणार बाजी

दै जनप्रभात उरण तालुका प्रतिनिधी (विठ्ठल ममताबादे) उरण दि ५



उरण तालुक्यात चाणजे पंचायत समिती शिवसेना उमेदवार अक्षय म्हात्रे (निशाणी धनुष्यबाण)हे निवडणूक लढवीत आहेत. अक्षय म्हात्रे हे स्वच्छ, चारित्र्य संपन्न उमेदवार आहेत व उत्तम नेतृत्वामूळे ते निवडणुकीत बाजी मारणार असल्याची चर्चा सर्वत्र सूरू आहे. चाणजे पंचायत समिती गणाचे उमेदवार अक्षय म्हात्रे हे उच्चशिक्षित व सुसंस्कृत उमेदवार आहेत शिवसेना (निशाणी – धनुष्यबाण) पक्षाच्या वतीने ते चाणजे पंचायत समितीची उमेदवारी लढवत आहेत. अक्षय म्हात्रे यांचे आई-वडिलांनी समाजात अनेक चांगले काम केले आहेत. कोणताही स्वार्थ न बाळगता गोर गरीब,वृद्ध,विधवा,अपंग, अविवाहित अनाथांना मदत केली आहे. विविध शासकीय सेवा योजनाचा लाभ मिळवून दिला आहे, धोबीघाट बांधले, अक्षय म्हात्रे हे निवडून आल्यानंतर प्रकल्पबाधीत शेतकरी व मच्छिमार बांधवांना मोबदला मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणार,पाणी वीज रस्ते या मूलभूत सुविधा जनतेला मिळवून देणार.रोजगारा चा प्रश्न मार्गी लावणार. २४ तास जनतेसाठी कार्यरत राहणार असे अक्षय म्हात्रे यांनी सांगितले. कोणतेही मोठे पद नसतानाही अनेक विकास कामे अक्षय म्हात्रे यांनी केली आहेत.कोंढरीपाडा डिपी ते कासवले रस्त्याला विजेची व्यवस्था केली आहे. हनुमान मंदिर कोंढरी पाडा ते कोंढरी पाडा डिपी या ठिकाणी स्ट्रीट लाईट तसेच बापदेवपाडा ते कासवलेपाडा बंदर किनारी रस्त्याला लाईट बसण्यासाठी पाठपुरावा, प्रयत्न केले.आणि लवकरच ते काम पूर्णत्वास नेणार. अनेक रुग्णांना वैद्यकीय मदत मिळवून दिली. असे अनेक विकासकामे करून अक्षय म्हात्रे यांनी जनतेचे प्रश्न मार्गी लावली आहेत.उत्तम कार्य केल्याने उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी त्यांना प्रमाणपत्र देऊन गौरविले आहे . अशा उमेदवाराला जनता नक्कीच निवडून देईल अशी चर्चा सर्वत्र सुरु आहे.नाक्या नाक्यावर सर्वत्र अक्षय म्हात्रे यांच्याच विजयाची चर्चा सुरु आहे .

यशवंतनगर गटाच्या सर्वांगीण विकासाची खरी ताकद राष्ट्रवादीकडेच – युवा नेते विकास शिंदे

वाई, दि. ६ फेब्रुवारी २०२६:

वाई तालुक्यातील पश्चिम भागाच्या सर्वांगीण विकासासाठी राष्ट्रवादी काँग्रेसच खऱ्या अर्थाने सक्षम असून, या भागाचा कायापालट राष्ट्रवादीच्या नेतृत्वाखालीच झाला आहे, असा ठाम विश्वास युवा नेते श्री. विकास शिंदे यांनी पत्रकारांशी बोलताना व्यक्त केला.यावेळी बोलताना विकास शिंदे म्हणाले की, पश्चिम भागातील राष्ट्रवादी काँग्रेसचा गट आणि लोकनेते बापूसाहेब शिंदे यांचा गट आता पूर्णपणे एकवटलेला असून, विकासासाठी सर्व शक्ती एकत्र काम करत आहेत. जननायक आमदार नामदार मकरंद आबा पाटील व राज्यसभा खासदार नितीन काका पाटील यांच्या माध्यमातून पश्चिम भागासाठी कोट्यवधी रुपयांच्या विकास योजना मंजूर करण्यात आल्या आहेत. यामध्ये विशेषतः ८५ कोटी रुपयांची जललक्ष्मी योजना पश्चिम भागाच्या विकासात निर्णायक भूमिका बजावत आहे.राज्य व केंद्र शासनाच्या अनेक महत्त्वाकांक्षी योजना नामदारांच्या माध्यमातून पश्चिम भागात यशस्वीपणे राबविण्यात आल्या असून, नामदार मकरंद पाटील यांनी दिलेला शब्द अंतिम असतो, हे जनतेने वेळोवेळी अनुभवले आहे, असेही विकास शिंदे यांनी नमूद केले.लोकनेते बापूसाहेब शिंदे हे गेली पन्नास वर्षे पश्चिम भागात निस्वार्थपणे समाजसेवेचे कार्य करत असून, त्यांनी स्वखर्चातून मंदिरे, समाजमंदिरे उभारून सामाजिक ऐक्य मजबूत केले आहे. लोकनेते बापूसाहेब शिंदे हे पश्चिम भागाच्या विकासाचे शिल्पकार असून, त्यांच्या नेतृत्वाखाली परिसरात अभूतपूर्व विकासकामे झाली आहेत. जनतेच्या प्रत्येक प्रश्नावर ठामपणे उभे राहून त्यांनी विश्वासार्ह नेतृत्वाचा आदर्श निर्माण केला आहे. आगामी काळात पश्चिम भागाचा विकास अधिक वेगाने घडवून आणण्याची ताकद बापूसाहेब शिंदे यांच्या नेतृत्वातच आहे, असा ठाम विश्वास नागरिक व्यक्त करत आहेत.“मी स्वतः गेली २६ वर्षे समाजकारणात कार्यरत असून, या भागाच्या विकासासाठी सातत्याने प्रयत्न करत आहे,” असेही विकास शिंदे म्हणाले.दुर्दैवाने अजितदादांचे अपघाती निधन झाले , त्यांच्या जाण्याने संपूर्ण महाराष्ट्रावर शोककळा पसरली आहे. त्यांच्या दूरदृष्टीच्या नेतृत्वामुळेच नामदार मकरंद आबा पाटील व नितीन काका पाटील यांच्या माध्यमातून वाई तालुक्यातील अनेक प्रलंबित प्रश्न मार्गी लागले असून, डोंगराएवढी विकासकामे पूर्णत्वास नेली आहेत. अजितदादांच्या विचारांना खरी श्रद्धांजली म्हणजे यशवंतनगर गटातील राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवारांना प्रचंड मतांनी विजयी करून त्यांचे स्वप्न पूर्ण करणे होय, असे आवाहनही त्यांनी केले.फक्त आणि फक्त विकासाच्या जोरावरच यशवंतनगर गटातील राष्ट्रवादी काँग्रेसचे तिन्ही उमेदवार विजयी होतील, असा ठाम विश्वास युवा नेते विकास शिंदे यांनी व्यक्त केला.



पंधराशे लोकसंख्येच्या सावळेश्वरमध्ये १५ हजारांहून अधिक जन्म–मृत्यू नोंदींचा संशयास्पद ‘सीआरएस’ घोटाळा

झारखंड, उत्तराखंड, लखनऊ येथील नागरिकांच्या नोंदींची चर्चा; नांदेडमधील टोळीवर संशय

कंधार ! (संतोष कांबळेकंधार) तालुक्यातील सावळेश्वर या गावाची २०११ च्या जनगणनेनुसार लोकसंख्या अवघी पंधराशे असताना, सन २०२५ मध्ये ‘ॲड ओल्ड इव्हेंट’ (विलंबित जुने जन्म–मृत्यू नोंदी) या नावाखाली तब्बल १५ हजार ५७० जन्म व मृत्यू नोंदी झाल्याचे उघडकीस आल्याने तालुक्यासह संपूर्ण जिल्ह्यात खळबळ उडाली आहे. हा प्रकार केवळ स्थानिक मर्यादित नसून राज्यस्तरावरील मोठ्या घोटाळ्याचे संकेत देणारा मानला जात आहे.महाराष्ट्र शासनाच्या पुणे येथील जन्म–मृत्यू निबंधक कार्यालयाकडून प्राप्त माहितीनुसार या नोंदी केंद्रीय सीआरएस (Civil Registration System) पोर्टलवर वाढवण्यात आल्याचे स्पष्ट झाले आहे. लोकसंख्येच्या तुलनेत इतक्या मोठ्या प्रमाणावर नोंदी कशा झाल्या, याबाबत गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत. दरम्यान, प्रथमदर्शनी पाहता या नोंदींमध्ये झारखंड, उत्तराखंड तसेच उत्तर प्रदेशातील लखनऊ येथील नागरिकांच्या जन्म–मृत्यू नोंदी असल्याची चर्चा प्रशासन व नागरिकांमध्ये सुरू आहे. एका ग्रामपंचायतीच्या हद्दीत इतर राज्यांतील नागरिकांच्या इतक्या मोठ्या प्रमाणात नोंदी कशा प्रकारे झाल्या, याबाबत संशय व्यक्त केला जात आहे.याच अनुषंगाने नांदेड जिल्ह्यात कार्यरत असलेली एक टोळी आर्थिक मोबदल्याच्या बदल्यात कमी उत्पन्न गटातील नागरिकांच्या जन्म व मृत्यू नोंदी करून देत असल्याचा कारभार चालवते, अशीही चर्चा ऐकू येत आहे. या टोळीचा या प्रकरणाशी थेट किंवा अप्रत्यक्ष संबंध आहे का, याची चौकशी करण्याची मागणी होत आहे.विशेष म्हणजे, यवतमाळ जिल्ह्यातील सेंदूर, सनी, भवानी तसेच जळगाव जिल्ह्यातील रताळे गावातही अशाच स्वरूपाचे प्रकार उघडकीस आले असून, सावळेश्वरमधील घटना त्याच साखळीतील असण्याची शक्यता नाकारता येत नाही.या संपूर्ण प्रकरणाची सखोल व निष्पक्ष चौकशी व्हावी, यासाठी भाजप नेते किरीट सोमय्या यांनी नांदेडचे जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी तसेच कंधारचे गटविकास अधिकारी यांना निवेदन दिले आहे. दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी त्यांनी केली आहे.या प्रकारामुळे सावळेश्वर ग्रामपंचायत कार्यालयाकडून उस्माननगर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्याची प्रक्रिया उशिरापर्यंत सुरू होती. तालुक्यात एकच चर्चा रंगली असून ग्रामस्थांमध्ये तीव्र असंतोष व्यक्त केला जात आहे.प्राथमिक माहितीनुसार सीआरएस व ई-ग्राम स्वराज्य प्रणालीवरील जन्म, मृत्यू व विवाह नोंदणीसाठीचे युजर आयडी व पासवर्ड सायबर पद्धतीने गैरवापर करून ग्रामपंचायतीच्या नोंदी करण्यात आल्याची शक्यता तपास यंत्रणा गृहीत धरत आहे. या प्रकरणात नेमके कोण सहभागी आहेत, याचा शोध घेण्यासाठी राज्यस्तरावर हालचाली सुरू झाल्याचे समजते.महत्त्वाचे म्हणजे, जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांच्या पार्श्वभूमीवरच एवढा मोठा प्रकार समोर आल्याने, या घोटाळ्याचे राजकीय, प्रशासकीय तसेच कायदेशीर पडसाद राज्यभर उमटण्याची दाट शक्यता व्यक्त केली जात आहे.दरम्यान, भाजप नेते किरीट सोमय्या, एकनाथ दादा पवार तसेच विजय पाटील धोंडगे हे सावळेश्वरला भेट देणार असल्याची माहिती असून, पुढील काही दिवसांत या प्रकरणात मोठे खुलासे होण्याची शक्यता आहे. चौकट सावळेश्वर येथील ग्रामपंचायत कार्यालयाच्या अंतर्गत लोकसंख्या 1666 असून ती आता 15570 वर गेली यासंदर्भात चौकशी चालू असून त्यातील फक्त एकाच व्यक्तीचे जन्माची नोंद माझ्याकडून झाली असून ती पण तहसीलदार यांच्या आदेशानुसार घेण्यात आली यासंदर्भात झालेल्या संशयास्पद नोंदीची उस्माननगर पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात येत आहे भावना कावळे ग्रामसेवक सावळेश्वर

ग्रामीण भागातील शाश्वत विकासासाठी यशवंत विचाराच्या पाठीशी उभे रहा. बाळासाहेब पाटील

(राहुल पवार) कराड प्रतिनिधी,

कोपर्डे हवेली ता. कराड येथे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या कोपर्डे हवेली जिल्हा परिषद गटाच्या अधिकृत उमेदवार सौ.स्वाती सोमनाथ पवार, कोपर्डे हवेली पंचायत समिती गणाचे अधिकृत उमेदवार श्री सिद्धार्थ विलासराव चव्हाण आणि वाघेरी पंचायत समिती गणाच्या अधिकृत उमेदवार सौ.संगीता स्वप्निल पिसाळ यांच्या प्रचारार्थ राज्याचे माजी सहकार व पणन मंत्री सह्याद्रि सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन माननीय श्री बाळासाहेब पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये आणि शंकर गोपाळ चव्हाण आप्पा यांच्या अध्यक्षतेखाली भव्य प्रचार सभा संपन्न झाली.* या सभेसाठी कोपर्डे हवेली जिल्हा परिषद गटातील बहुसंख्य नागरिक उपस्थित होते यावेळी माजी सहकार मंत्री म्हणाले कराड उत्तर हा यशवंत याच्या विचाराचा मतदारसंघ आहे या मतदारसंघाचे नेतृत्व अपवाद वगळता माझ्यासारख्या कार्यकर्त्याला संधी दिली सामान्य जनतेच्या जीवावरती या मतदारसंघाचा प्रतिनिधित्व केले आज जिल्हा परिषद निवडणुकीच्या निमित्ताने पुन्हा एकदा यशवंताच्या विचाराची लढाई आम्ही लढत आहोत पंचायत राज्य संकल्पना यशवंतराव चव्हाण साहेबांनी अमलात आणली आज सत्यादारी पक्ष सत्तेच्या जीवावरती ग्रामीण भागातील जनतेला मी ग्रामविकास मंत्री आहे माझ्याशिवाय विजयी उमेदवारांना पर्याय नाही असं वक्तव्य जाहीर सभेत करून जनतेच्या मनामध्ये संभ्रम निर्माण करत आहे सामान्य जनतेच्या त्यातून एक एक रुपया गोळा होतो लोकप्रतिनिधी हा जनतेचा सेवक आहे अशा प्रकारे जाहीर सभेत वक्तव्य करून जनतेची दिशाभूल करणे लोकशाहीला घातक आहे सामान्य जनता मतपेटीतून योग्य न्याय देईल. जिल्हा परिषद निवडणुकीत उमेदवार स्वाती पवार. लोकशाहीत प्रत्येकाला निवडणूक लढण्याचा अधिकार आहे माझ्यावर मी मतदार संघात राहत नाही मी पुण्यात वास्तव्य करत आहे अशी टीका करणे म्हणजे जनतेची दिशाभूल करणे आहे निवडणूक ही विकास ग्रामीण विकासावरती विकासाच्या मुद्द्यावरती लढली पाहिजे वैयक्तिक टीका करून सामाजिक वातावरण बिघडवणं हे लोकशाहीला घातक आहे येणाऱ्या निवडणुकीत सामान्य जनता आम्हाला आशीर्वाद देईल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.सभेच्या प्रारंभी राज्याचे लोकप्रिय उपमुख्यमंत्री आदरणीय अजितदादा पवार यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहिली.तुतारी वाजविणारा माणूस या चिन्हा समोरील बटन दाबून राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार आणि मित्रपक्ष आघाडीच्या सर्वच अधिकृत उमेदवारांना विक्रमी मताधिक्याने विजयी करा असे आवाहन यावेळी माजी सहकार व पणन मंत्री मा. श्री बाळासाहेब पाटील यांनी केले.सभेस राष्ट्रीय काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस अजितराव पाटील (आप्पा) चिखलीकर, मारुती बुधे, शंकरराव खापे (बापू) सुहास बोराटे, बाळासाहेब सूर्यवंशी, शंकरराव बंडू चव्हाण, सुनील जगदाळे, नेताजी चव्हाण, गोविंदराव थोरात, शंकरराव पाटील, विजय जगदाळे, अनिल जगदाळे, मानसिंग जगदाळे (बापू), दत्तात्रय चव्हाण, शकुंतला चव्हाण, सुजाता चव्हाण, भीमराव ढमाले, भीमराव इंगवले, शारदाताई पाटील, विलासराव थोरात, सुधाकर रामुगडे, संभाजी यादव, लक्ष्मण चव्हाण, शांताराम पवार, खशाबा वेताळ, सुनील पोळ, महादेव पोळ, सीमा साळवे, शंकरराव चव्हाण (गुरुजी) बाळासो पाटील, धैर्यशील पाटील, लक्ष्मण चव्हाण, पोपट गोविंद चव्हाण, उत्तमराव चव्हाण, मारुती चव्हाण, यांच्यासह कोपर्डे हवेली जिल्हा परिषद गटातील प्रमुख पदाधिकारी, ज्येष्ठ नागरिक, युवक मित्र, माता-भगिनी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



एकात्मता उच्च प्राथमिक विद्यालयाचे वार्षिक स्नेहसंमेलन संपन्न

नागपूर (दिलीप येवले) :–



सत्यमेव जयते शिक्षण प्रसारक मंडळ नागपूर द्वारा आयोजित एकात्मता उच्च प्राथमिक विद्यालयाचे वार्षिक स्नेहसंमेलन मोठया थाटात संपन्न झाले. त्यामध्ये विद्यार्थ्यांनी आपल्या नृत्याने उपस्थित यांचे मनमोहन टाकले. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या प्रत्येक कलाकृतीवर उपस्थित आणि भरभरून दाद दिली. शाळा सतत विद्यार्थ्यांच्या कलाना वाव देत असते. मुलातील सुप्त गुण शोधून त्यांना प्रोत्साहित करत असते. त्याचप्रमाणे शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. सुरेखा प्रदीप मानवटकर यांचा सेवानिवृत्ती सोहळा सुद्धा पार पाडण्यात आला. त्यासाठी संस्थेच्या अध्यक्षा कलिता हिरेखन, सचिव दशरथ बनसोड, सहसचिव टीकाराम शेंडे, संस्थेचे पदाधिकारी व चारही शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शुभांगी कातुरे, सुनीता गावंडे, जयमाला धोटे, धनश्री ढेगेकर, शरद उरकुडे यांनी प्रयत्न केले.

सालई येथे विश्व् गुरु श्री संत रविदास जयंती 649 वी साजरी

नागपूर (दिलीप येवले) :–



सालई गोधनी हुडकेश्वर रोड येथे, श्री संत रविदास जयंती साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाला रविदास धाम च्या मंदिरावर संत रविदास यांच्या प्रतिमेला लखन एरावार नगरसेवक यांचे हस्ते हार अर्पण करून माल्यार्पण करण्यात आले. याप्रसंगी ज्ञानेश्वर बसेशंकर, हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. याप्रसंगी श्री संतांच्या विचार यावर प्रकाश टाकण्यात आला. श्री संत रविदास धाम हें विदर्भातील सर्वात मोठे धाम असल्यामुळे दिवसभर दर्शन करण्याऱ्या भाविकांची गर्दी उसळली होती. कार्यक्रमाचे संचालन श्री मंदिराचे व्यवस्थापक प्रकाश कुहिकर यांनी केले तर याप्रसंगी अनेक मान्यवरांनी आपले विचार व्यक्त केले. सौ. मीना शेंडे पोलीस पाटील यांनी उपस्थितांचे आभार मानले. कार्यक्रमाला सर्वश्री रवी बनसोड, वासुदेव डहाके, जव्हार कुहीकर, लालचंद शेंडे, इतर सहकारी उपस्थित होते. सरते शेवटी प्रसाद म्हणून हलवा वाटप करण्यात आले. या कार्यक्रमात चर्मकार समाज मोठ्या संख्येने उपस्थितीत होते.

भारतीय इतिहासाचे करायचेय लेखन- श्री रवी शंकरजी

• इतिहासच घडवतो इतिहास • कुलगुरू डॉ.क्षीरसागर-विद्यापीठात एक दिवसीय आंतरविद्याशाखीय परिषद

नागपूर : (दिलीप येवले)



स मार्गदर्शन करताना स्वेतलाना सिदोरोवा

व्यापारी म्हणून आलेल्या इंग्रज राज्यकर्त्यांनी लिहिलेल्या इतिहासात स्थानिकांना गाळले असून भारताचा खरा इतिहास लिहायचा असल्याचे प्रतिपादन इंटरनॅशनल सेंटर फॉर कल्चरल स्टडीज इंडियाचे रिसर्च ऑफिसर श्री. रवी शंकरजी यांनी केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचा पदव्युत्तर इतिहास विभाग, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष (आयक्यूएसी) तसेच इंटरनॅशनल सेंटर फॉर कल्चरल स्टडीज इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने एक दिवसीय आंतरराष्ट्रीय परिषद औषधी निर्माणशास्त्र विभागाच्या डॉ. ऐ. के. डोरले सभागृहात बुधवार, दि. ४ फेब्रुवारी २०२६ रोजी पार पडली. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून श्री. रवी शंकरजी मार्गदर्शन करीत होते. 'ऐतिहासिक आणि सांस्कृतिक अभ्यासाचा दृष्टिकोन बदलणे' या विषयावर आयोजित आंतरराष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटनीय कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान कुलगुरू डॉ. मनाली क्षीरसागर यांनी भूषविले, प्रमुख अतिथी म्हणून इंटरनॅशनल सेंटर फॉर कल्चरल स्टडीज इंडियाचे रिसर्च ऑफिसर श्री. रवी शंकरजी, रशिया येथील संशोधक डॉ. स्वेतलाना सिदोरोवा, पोलीस विभागाच्या माहिती व तंत्रज्ञान विभागातील वरिष्ठ तांत्रिक अधिकारी डॉ. प्रवीण योगी, आयक्यूएसी संचालक डॉ. नंदकिशोर करडे, मानव विज्ञान विद्याशाखा अधिष्ठाता तथा इतिहास विभाग प्रमुख डॉ. शामराव कोरेटी, परिषदेचे समन्वयक प्रा. स्वप्निल पाटील यांची उपस्थिती होती. साम्राज्य विस्ताराच्या उद्देशाने व्यापारासाठी बाहेर पडलेल्या इंग्रज तसेच अन्य साम्राज्यवादी देशातील व्यापाऱ्यांच्या वसाहती निर्माण झाल्या. व्हेनेझुएलाचे उदाहरण देत अशा देशांमध्ये सद्यस्थितीत स्थानिक विरुद्ध स्थलांतरित यांच्या संघर्ष होताना दिसून येत आहे. भारतात इंग्रजांच्या वसाहती निर्माण न झाल्याने संघर्षाची स्थिती येथे निर्माण झाली नाही. इंग्रजांच्या वसाहती नसल्या तरी भारतीयांची मानसिकता त्यांनी बदलली. याच बदलातून इतिहासाचे पुनर्लेखन झाल्याचे श्री रविशंकर म्हणाले. एका पिढीपासून दुसऱ्या पिढीपर्यंत येणारी परंपरा, संस्कृती हा इतिहास महत्व पूर्ण ठरतो. मात्र, उज्वल असा सांस्कृतिक समृद्ध असलेल्या भारतीय इतिहासाला इंग्रजांच्या काळात ब्रेक लागला. समृद्ध असलेल्या प्राचीन भारतीय इतिहासाला बाधित करण्याचे कार्य झाले. मात्र, तंत्रज्ञानाच्या आधारे प्राचीन इतिहासाचे नवीन पुरावे समोर येत आहे. प्राचीन भारतात समाज, संस्कृती, सभ्यता किती प्रगत आणि समृद्ध होती, हे निदर्शनास येत आहे. विविध भ्यतेतील लोककथांचा आशय संपूर्ण जगात सारखाच दिसून येतो, असे श्री रवी शंकरजी म्हणाले. भारताचा तत्कालीन इतिहास लिहिणारे ज्ञानी नव्हे तर व्यापारी होते. प्राचीन इतिहासाचे त्यांनी लेखन केले नसून केवळ लेबल लावले आहे. आपली ज्ञान परंपरा त्यांनी नष्ट केली आहे. या ज्ञान परंपरेला विकसित कसे करता येईल याचा विचार होणे गरजेचे आहे. भारताची संस्कृती केवळ सिंधू संस्कृती पासून नाही. तर महाभारत, रामायण आदी पुरातन कालीन आहे. साम्राज्यवादी इतिहासकारांनी मारलेला शिक्का पुसून निरपेक्षपणे खऱ्या भारतीय इतिहासाचे लेखन करण्याची गरज त्यांनी व्यक्त केली.

इतिहासच घडवतो इतिहास – कुलगुरू डॉ.क्षीरसागरसंपूर्ण जगाला भारतीय संस्कृतीचे इतिहासाचे आकर्षण आहे. संपूर्ण जग भारतीय संस्कृतीचा अभ्यास करीत असताना आपण आपली संस्कृती विसरायला नको. भारतीय ज्ञान परंपरा विकसित करीत इतिहास घडविण्याची संधी आपणाकडे असून इतिहासच इतिहास घडवतो, असे अध्यक्षीय भाषण करताना कुलगुरू डॉ. मनाली क्षीरसागर यांनी सांगितले. तरुणांना आपल्या प्राचीन भारतीय इतिहास आणि संस्कृती बाबत जागरूक करण्याची आवश्यकता व्यक्त करीत या कार्यशाळेच्या माध्यमातून आपण आपल्या परंपरेचा अभ्यास तसेच संशोधन करू शकतो, असे देखील कुलगुरू म्हणाल्या.

रशियन संशोधकाकडून गोंडी संस्कृतीचे सादरीकरण

विद्यापीठात आयोजित आंतरराष्ट्रीय परिषदेत रशिया येथील संशोधक डॉ. स्वेतलाना सिदोरोवा यांनी मध्य भारतातील गोंडी समाजाच्या संस्कृतीचे सादरीकरण केले. भारताच्या विविध भागातून नागपूर शहरापर्यंत मोजमाप गोंडी भाषेतील कोस या शब्दाचा वापर करून कशाप्रकारे केली. पुढील काळात नागपूर शहर हे केंद्रस्थानी कसे आले याबाबत माहिती दिली. गोंडी संस्कृतीचा अभ्यास करताना समाजातील विविध परंपरा चालीरीती आणि जगाच्या विविध भागात असलेल्या समुदायामधील साम्य या दृष्टीने विस्तृत माहिती दिली. इंग्रज कालीन वसाहतीत येथील गोंडी सह इतर समुदायाचे सामाजिक जीवन, शिक्षण कृषी भौगोलिक परिस्थिती आदी विविध स्वरूपाची माहिती त्यांनी दिली. या सोबतच तत्कालीन आणि सद्यस्थितीत आलेला बदल देखील त्यांनी आपल्या संशोधनाच्या माध्यमातून यावेळी सांगितला.प्रास्ताविक करताना आंतरविद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा अधिष्ठाता तथा इतिहास विभाग प्रमुख डॉ. शामराव कोरेटी यांनी कार्यशाळेच्या आयोजनाबाबत माहिती दिली इंटरनॅशनल सेंटर फॉर कल्चरल स्टडीज इंडिया या संस्थेच्या माध्यमातून भारतीय ज्ञान परंपरेच्या विकासासाठी कशाप्रकारे कार्य केले जात आहे याची माहिती त्यांनी दिली. सोबतच १०२ वर्ष पूर्ण करणाऱ्या विद्यापीठाचा इतिहास तसेच विविध विभागांची माहिती यावेळी त्यांनी दिली. कार्यक्रमाचे संचालन प्रा. अलिशा सहाय यांनी केले. कार्यक्रमाला विविध भागातून आलेले प्रतिनिधी इतिहास तज्ञ विविध शैक्षणिक विभागांचे प्रमुख शिक्षक कर्मचारी तसेच विद्यार्थ्यांची मोठ्या संख्येने उपस्थित होते.

श्रमसंस्कार शिबिरात डॉ. रामटेके यांनी मधुमेह नियंत्रणाचे वैज्ञानिक उपाय सांगितले

कामठी (दिलीप येवले) :



स्थानिक पोरवाल महाविद्यालयाने घोरपड (शिरपूर) येथे रासयोतर्फे आयोजित विशेष श्रमसंस्कार शिबिरांतर्गत 04 फेब्रुवारी 2026 रोजी "योग आणि आरोग्य – मधुमेहाचे वैज्ञानिक समाधान" या विषयावर महत्त्वपूर्ण व्याख्यान आयोजित केले. या प्रसंगी सेठ केसरीमल पोरवाल महाविद्यालय, कामठी येथील शारीरिक शिक्षण विभागाचे असोसिएट प्राध्यापक डॉ. जयंत कुमार रामटेके यांनी प्रमुख वक्ते म्हणून विद्यार्थी व ग्रामस्थांना मार्गदर्शन केले.आपल्या व्याख्यानात डॉ. रामटेके यांनी सांगितले की, अनेकदा हलका आहार घेतल्यावर किंवा गोड पदार्थ टाळल्यावरही सकाळची फास्टिंग शुगर वाढते. यामागील मुख्य कारण म्हणजे ताणतणाव, चिंता आणि झोपेअभावी होणारे हार्मोनल बदल. त्यांनी कॉर्टिसोल व ॲड्रेनालिनच्या वाढत्या पातळीमुळे इन्सुलिन रेसिस्टन्स वाढते, असे स्पष्ट केले तसेच ग्लुकोनिओजेनेसिस प्रक्रियेद्वारे लिव्हर शुगर तयार करते याची वैज्ञानिक माहिती दिली.त्यांनी योग, प्राणायाम आणि ध्यानाचे महत्त्व अधोरेखित करत नियमित सरावामुळे ताण कमी होतो, स्नायू सक्रिय राहतात आणि शरीराची शुगर नियंत्रण क्षमता वाढते, असे सांगितले. तसेच दररोज 30 ते 45 मिनिटे ब्रिस्क वॉक, पुरेशी झोप, डिजिटल डिटॉक्स आणि नियमित आरोग्य तपासणी यांसारख्या जीवनशैलीतील बदलांची गरजही त्यांनी स्पष्ट केली.कार्यक्रमाचे अध्यक्ष दत्तक ग्राम अभियान व ग्रामोन्नती प्रकोष्ठाचे संयोजक तसेच इतिहास विभागप्रमुख डॉ. जितेंद्र सावजी तागडे यांनी योग आणि आरोग्याचा इतिहास सांगत योग समाजहितासाठी सर्वसामान्यांपर्यंत सोप्या भाषेत व तंत्रात पोहोचवण्याचे आवाहन केले. रासयो स्वयंसेवकांच्या श्रमदान, योग सत्रे आणि "युवा मेरे भारत अभियान"मधील सक्रिय सहभागाचे त्यांनी कौतुक त्यांनी केले.शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी महाविद्यालय व्यवस्थापन, शिबिर संयोजक डॉ. विनोद शेंडे, डॉ. निशिता अंबादे (महिला कार्यक्रम अधिकारी) तसेच आयोजन समितीचे सदस्य— डॉ. दीपक भावसागर, डॉ. राजेश पराते, डॉ. रश्मी जाचक, डॉ. तारुण्य मुलतानी आदींचे विशेष योगदान राहिले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन धनुश्री कडसाल यांनी केले तर आभार प्रदर्शन रिया चंद्रोल यांनी केले.या कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये आरोग्याबाबत जागरूकता आणि शिस्तबद्ध जीवनशैलीचे महत्त्व अधिक दृढ झाले. आयोजकांनी भविष्यातही असे जनजागृतीपर कार्यक्रम सुरू ठेवण्याचा संकल्प व्यक्त केला.

सेलू येथील दीपचंद शाळेचे माजी विद्यार्थी प्रा. डॉ. विवेक जगताप यांना मिळाले दोन पेटंट्स

सेलू. प्रशांत झाडे



सेलू येथील दीपचंद शाळेचे माजी विद्यार्थी व तसेच गिला नी महाविद्यालयाचे प्राध्यापक डॉ. विवेक के. जगताप यांनी संशोधन क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करत भारत सरकारकडून दोन नवे पेटंट्स मिळवले आहेत. डॉ. जगताप हे कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) या क्षेत्रात सातत्याने नावीन्यपूर्ण संशोधन करत आहेत. त्यांच्या नावावर यापूर्वीही एक पेटंट नोंदणीकृत असून, आता मिळालेल्या दोन नव्या पेटंट्समुळे एकूण तीन पेटंट्स त्यांच्या नावावर झाले आहेत. पेटंट्स सोबतच जगताप यांचे आजतोवर कृत्रिम बुद्धिमत्ता या विषयावर दहा पुस्तके प्रकाशित झालेले आहेत.डॉ. जगताप यांना मिळालेले पहिले पेटंट "Smart AI Librarian's Kiosk" या प्रणालीसाठी आहे. ही प्रणाली कृत्रिम बुद्धिमत्तेच्या साहाय्याने ग्रंथालयातील वाचकांना योग्य पुस्तके, संदर्भ साहित्य व डिजिटल साधने सुचवते. वाचकांच्या गरजेनुसार माहिती देणारा हा स्मार्ट कियोस्क ग्रंथालय सेवा अधिक प्रभावी, वेगवान आणि वापरकर्ता-केंद्रित बनवतो.दुसरे पेटंट "Footfall Counting Device" या उपकरणासाठी आहे. हे एक युझर्स चे ये-जा (in - out) मोजणारे स्वयंचलित यंत्र असून, इन्फ्रारेड सेन्सरच्या मदतीने येणाऱ्या व जाणाऱ्या व्यक्तींची अचूक संख्या मोजते. हे उपकरण इंटरनेटशिवाय स्थानिक Wi-Fi नेटवर्कवर कार्य करते आणि मोबाईल किंवा संगणकावर थेट रिअल टाइम माहिती दाखवते. शाळा, महाविद्यालये, ग्रंथालये, प्रयोगशाळा व कार्यालयांमध्ये उपस्थिती मोजण्यासाठी हे अत्यंत उपयुक्त ठरणार आहे. विशेष म्हणजे हे उपकरण तयार करण्यात त्यांचा मुलगा अर्थ जगताप याचे विशेष सहकार्य लाभले आहे.या यशाबद्दल प्रतिक्रिया व्यक्त करताना डॉ. जगताप म्हणाले की, "संशोधन ही सतत चालणारी प्रक्रिया आहे. समाजोपयोगी तंत्रज्ञान विकसित करणे हेच माझे ध्येय आहे." या यशाचे श्रेय त्यांनी गिलानी महाविद्यालयाचे अध्यक्ष मा. जे. जे. गिलानी, उपाध्यक्ष मा. अल्ताफजी गिलानी, माजी प्राचार्य डॉ. एम. ए. शहेजाद तसेच प्रभारी प्राचार्य डॉ. वाय. एस. माहुरे यांना दिले.डॉ. विवेक जगताप यांच्या या यशामुळे महाविद्यालयाच्या शैक्षणिक व संशोधन क्षेत्रातील प्रतिमेला नवे बळ मिळाले असून, भविष्यात त्यांच्या संशोधनातून आणखी नावीन्यपूर्ण तंत्रज्ञान समाजासाठी उपलब्ध होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

ले. ज. राजेंद्र निंभोरकर इंग्लिश स्कूलमध्ये वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात साजरे

तळेगाव प्रतिनिधी ले. ज. राजेंद्र निंभोरकर

इंग्लिश स्कूलमध्ये दिनांक 31 जानेवारी ते 2 फेब्रुवारी रोजी स्नेहसंमेलन सोहळा मोठ्या उत्साहात आणि जल्लोषात नुकताच पार पडला. ले.ज. रा. नि. इंग्लिश स्कूलच्या परंपरेनुसार विशिष्ट संकल्पनेवर आधारित स्नेहसंमेलनाचे आयोजन करण्यात आले. यावर्षी समर्थ भारत सक्षम सेना या संकल्पनेवर आधारित कार्यक्रम सादर करण्यात आला. यामध्ये तीन दिवसीय कार्यक्रमात नर्सरी ते दहावीच्या विद्यार्थ्यांनी भाव साक्षरता, ऐतिहासिक देखावे, वैज्ञानिक दृष्टिकोन, सामाजिक व राष्ट्रीय जबाबदारी, ध्येय निश्चिती, निसर्गाबद्दल कृतज्ञता तसेच अनेक अशा



समाजमन घडवणाऱ्या विषयावर मुलांनी सुंदर नृत्य व नाट्य सादरीकरण केले. वार्षिक स्नेहसंमेलन म्हणजे विद्यार्थ्यांसाठी कलागुण सादर करण्याची पर्वणीच असते असे प्रतिपादन कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी मा.आ.श्री.सुमितजी वानखेडे यांनी उद्घाटनाप्रसंगी केले. या कार्यक्रमाच्या उद्घाटनाप्रसंगी प्रमुख अतिथी मा.आ.सुमिटजी वानखेडे, मराठा शिक्षण संस्था अध्यक्ष मा.श्री दिलीप भाऊ निंभोरकर, उपाध्यक्ष ले.ज. राजेंद्र निंभोरकर, संचालक मा.श्री. सुधीरभाऊ निंभोरकर, सौ. निष्ठाताई निंभोरकर, सचिव लिलाधरजी सालोडे, आय. एम. एस. ई. संचालक सौ. नीता अढाऊ,कोषाध्यक्ष श्री. प्रवीणभाऊ निंभोरकर, सदस्य मा. सौ.पदमाताई निंभोरकर, सौ.नीतीजाताई निंभोरकर आणि पी.डी पाटील शैक्षणिक संकुलातील सर्व शाखेचे प्राचार्य डॉ. संदीप निंभोरकर, संचालक डॉ. विक्रम सालोडे, प्राचार्य कोशिक गभने,प्राचार्य अतुल ठाकरे, व्यवस्थापक जी.सी.सिंग, श्याम ईखार, प्रिया नेहर ,पंकज निंभोरकर, गौरव चन्ने, विशाल गाडगे,रोशन रामदे,आनंद भालेराव, किरण बढिये शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारीव सर्व पत्रकार उपस्थित होते. याप्रसंगी दीप प्रज्वलन तसेच प्रतिमा पूजन करून गणेश वंदनाने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. यानंतर उपस्थित सर्व मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. यावेळी ले. ज. राजेंद्र निंभोरकर शाळेचा जीवनप्रवास सादर करीत विद्यार्थ्यांनी नृत्य,कला, नाटिका द्वारे विविध कलाविष्कार सादर केले. तदनंतर दिनांक 2 फेब्रुवारी 2026 रोजी स्नेहसंमेलनाचा समारोपय कार्यक्रम संपन्न झाला. याप्रसंगी मराठा शिक्षण संस्थेच्या वतीने S S C , शिष्यवृत्ती, नवोदय प्राविण्य श्रेणीतील विद्यार्थ्यांचा गौरव आणि स्नेहसंमेलनातील सहभागी विद्यार्थ्यांचे कौतुक करण्यात आले.

नूतन कन्या विद्यालयामध्ये माजी विद्यार्थ्यांचा भव्य मेळावा

तळेगाव प्रतिनिधी



आज दिनांक 24 जानेवारी 2026 शनिवारला नूतन कन्या विद्यालय मध्ये माजी विद्यार्थ्यांचा भव्य मेळावा घेण्यात आला या कार्यक्रमांमध्ये अध्यक्ष म्हणून मा. श्रीमती शोभाताई काळे मॅडम (अध्यक्षा कृषक एज्युकेशन सोसायटी आणि भारत एज्युकेशन सोसायटी, आर्वी) उपस्थित होत्या . त्यांनी विद्यार्थ्यांचा हा प्रतिसाद बघून खूप आनंद व्यक्त केला आणि उपस्थित सर्व माजी विद्यार्थिनींचे खूप कौतुक केले. आज जरी शाळेमध्ये सेमी इंग्लिश आले असले तरीही मराठीचा दर्जा हा पहिलाच राहणार आहे, असे मत कार्यक्रमाच्या प्रमुख अतिथी म्हणून लाभलेल्या माननीय सौ बेलोरकर मॅडम (डेपो मॅनेजर, तळेगाव) यांनी व्यक्त केले. माजी विद्यार्थ्यांचा कार्यक्रम शाळेच्या मुख्याध्यापिका मा. सौ शारदा पाटील मॅडम यांच्या मार्गदर्शनामुळे व्यवस्थीत पार पाडू शकला. तसेच महल्ले मॅडम , इंगळे मॅडम, पद्मा कदम मॅडम, उमरे मॅडम या माजी शिक्षीका नूतन कन्या विद्यालय तळेगाव येथे अतिथी म्हणून उपस्थित होत्या.तसेच कार्यरत आसलेले गडेकर सर , राऊत सर , ढोके मॅडम , दलाल सर, पखाले सर मोरे मॅडम, बोबडे मॅडम कार्यक्रमाला उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी कु.मिनाक्षी भारती,जुही भारती,आश्वीनी घावडे,विना भूयार, आश्वीनी फरकाडे,प्रणाली टर्के,संध्या भुयार, या माजी विद्यार्थ्यांनी पुढाकार घेतला. कार्यक्रमाप्रसंगी माजी विद्यार्थिनींनी मिळून शाळेला उत्कृष्ट भेटवस्तू दिली. कार्यक्रमाचे उत्कृष्ट संचालन कुमारी अश्विनी फरकाडे तर आभार प्रदर्शन जुही भारती यांनी केले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक कु.चंचल घाटोळ हीने तर पाहुण्यांचा परिचय कु.विजया बोबडे हिने केले.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी श्री दलाल सर आणि ढोके मॅडम यांनी पुढाकार घेतला.

स्व. श्री.पी. बी. सोनेकर यांच्या जयंतीनिमित्त आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन

कोराडी (दिलीप येवले) :–

रवि बहुउद्देशिय शैक्षणिक संस्थेचे प्रेरणास्थान असलेल्या स्व. श्री.पी.बी. सोनेकर यांच्या जयंतीनिमित्त दि. ४ फेब्रुवारी रोजी संस्थेअंतर्गत येणाऱ्या कोराडी स्थित सोनेकर कॉलेज ऑफ फार्मसीच्या वतीने आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. हे आरोग्य शिबिर कोराडी ग्रामपंचायत, बैलवाडा ग्रामपंचायत, गुमथळा ग्रामपंचायत येथे यशस्वीरित्या पार पडले. शिबिरास परिसरातील ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला असून मोठ्या संख्येने नागरिकांनी या उपक्रमाचा लाभ घेतला.या शिबिरात मुख्यत्वे वजन,



रक्तदाब आणि ब्लड ग्लुकोज आदिची तपासणी करण्यात आली. या शिबिराचा मुख्य उद्देश ग्रामीण भागातील नागरिकांमध्ये आरोग्यविषयी जागरुकता निर्माण करणे, नियमित आरोग्य तपासणीचे महत्त्व पटवुन देणे तसेच प्रतिबंधात्मक आरोग्याबाबत जनजागृती करणे हा होता. शिबिराच्या माध्यमातून नागरिकांना आरोग्यविषयक मार्गदर्शन देण्यात आले.सदर आयोजित शिबिरास रवि बहुउद्देशिय शैक्षणिक संस्थेचे अध्यक्ष श्री. के. पी. सोनेकर, सचिव श्री. एम. पी. सोनेकर, सोनेकर कॉलेज ऑफ फार्मसी चे प्राचार्य डॉ. ए. एन. मलिये, रवि इस्टिटूट ऑफ डिप्लोमा इन फार्मसीचे प्राचार्य डॉ. सी. बी. चौरिया आदी मान्यवर तसेच शिक्षकवृंद आणि महाविद्यालयीन विद्यार्थी देखील मोठ्या संख्येने उपस्थित होते.शिबिराच्या आयोजनास ग्रामपंचायत अधिकारी व कर्मचारी यांचे मोलाचे सहकार्य लाभले. शिबिर उत्तमरित्या पार पडावा या करिता राष्ट्रिय सेवा समितीचे कार्यक्रम अधिकारी डॉ. आर.ए. साहु आणि सोनेकर कॉलेज ऑफ फार्मसीचे प्राध्यापकवृंद प्रा. एन व्ही. मदान, प्रा. व्ही. आर टहीलयानी, प्रा.एन. टी. हींगवे, प्रा. आर. आर. मीश्रा, डी. व्ही. पी. रोडे, प्रा. एस. एम. शेंडे, प्रा. पी. आर. कुथे, प्रा. एच एल. हिरवानी आदिनी तसेच शिक्षकवृंद व शिक्षकेतर कर्मचारी आदिंनी विशेष प्रयत्न केले.

विद्यापीठात आंतरविद्याशाखीय आंतरराष्ट्रीय परिषद बुधवारी-पदव्युत्तर इतिहास विभाग, आयक्यूएसी आणि भारतातील आंतरराष्ट्रीय सांस्कृतिक अभ्यास केंद्र यांचे संयुक्त आयोजन

नागपूर (दिलीप येवले) :

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात एक दिवशीय आंतर विद्याशाखीय आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन बुधवार, दि. ४ फेब्रुवारी २०२६ रोजी औषधी निर्माणशास्त्र विभागाच्या डॉ. ए. के. डोरले सभागृहात करण्यात आले आहे. विद्यापीठाचा पदव्युत्तर इतिहास विभाग अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष आयक्यूएसी आणि भारतातील आंतरराष्ट्रीय सांस्कृतिक अभ्यास केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने या परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे.'ऐतिहासिक आणि सांस्कृतिक अभ्यासाकडे पुन्हा पाहण्याचा दृष्टिकोन बदलणे' या विषयावर आयोजित आंतरराष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटनीय कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान माननीय कुलगुरू डॉ. मनाली क्षीरसागर भूषविणार आहे. दिवसभर चालणाऱ्या वेगवेगळ्या सत्रात आंतरराष्ट्रीय ख्यातीचे नामवंत वक्ते या परिषदेला उद्बोधन करतील. या परिषदेत भारतासह परदेशातील विविध विद्यापीठांम धील नामवंत अभ्यासक, प्राध्यापक, संशोधक तसेच पदव्युत्तर व संशोधन विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी होत आहेत.




इतिहासासह समाजशास्त्र, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, मानववंशशास्त्र, भाषाशास्त्र, संस्कृती अभ्यास व इतर संबंधित विषयांतील संशोधनाला एक व्यापक व्यासपीठ उपलब्ध करून देणे, हा या परिषदेचा मुख्य उद्देश आहे. परिषदेतील विविध सत्रांमध्ये ऐतिहासिक घडामोडी सोबतच समकालीन सामाजिक–आर्थिक बदल, ऐतिहासिक दृष्टिकोन, सांस्कृतिक परंपरा, जागतिकीकरणाचे परिणाम तसेच बहुविषयक संशोधन पद्धती यांवर सखोल व विचारप्रवर्तक चर्चा होणार आहे. आजच्या संशोधनात केवळ एका विषयापुरते मर्यादित न राहता विविध विषयांचा समन्वय साधणे गरजेचे असून, अशा परिषदांमुळे संशोधनाचा दर्जा उंचावण्यास मदत होते,परिषदेदरम्यान शोधनिबंध सादरीकरण, परिसंवाद, तज्ज्ञ व्याख्याने तसेच प्रश्नोत्तर सत्रांचे आयोजन करण्यात आले आहे. संशोधकांना आपले संशोधन आंतरराष्ट्रीय स्तरावर मांडण्याची संधी मिळत असून विचारांची देवाणघेवाण व शैक्षणिक सहकार्याला चालना मिळत आहे. विशेषतः विद्यार्थ्यांसाठी ही परिषद ज्ञानवृद्धीबरोबरच संशोधनासाठी प्रेरणादायी ठरत आहे. या आंतरराष्ट्रीय परिषदेच्या यशस्वी आयोजनात समन्वयक मानव विज्ञान विद्या शाखा अधिष्ठाता डॉ. शामराव कोरेटी, सहसमन्वयक प्रा.स्वप्निल पाटील आणि सचिव प्रा. अलिशा सहाय यांची भूमिका महत्त्वाची आहे. तसेच मानव्य विज्ञान विद्याशाखेतील सर्व विभाग प्रमुखांचे आणि शिक्षकांचे या परिषदेच्या आयोजनात सहकार्य आहे. शैक्षणिक व संशोधन क्षेत्रातील प्रतिमा अधिक बळकट होईल, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला आहे.

अमरावती रोड अन् हिंगणा रोडवरील संपर्क मजबूत करणारी 'आपली बस'

नागपूर, दिलीप येवले:

शहरातील वाहतूक अधिक सोपी व्हावी आणि शेवटच्या टप्प्यापर्यंत पोहोचणे सहज व्हावे, यासाठी नागपूर महानगरपालिकेच्या 'आपली बस' सेवेतील वडधामणा (अमरावती रोड) ते वानाडोंगरी (हिंगणा रोड) मार्ग क्रमांक ८७ वर ६ बस सुरू करण्यात आल्या आहेत. ही सेवा २ फेब्रुवारी २०२६ पासून सकाळी ७ वाजता मोरभवन येथील आपली बस टर्मिनल वरून सुरू होणार असून, दिवसभर दर ३० मिनिटांनी बस उपलब्ध असतील. या बस संध्याकाळी ७:३० वाजेपर्यंत धावणार आहेत.मनपा आयुक्त तथा



प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांच्या मार्गदर्शनात अतिरिक्त आयुक्त श्रीमती वसुमना पंत आणि परिवहन व्यवस्थापक तथा उपायुक्त डॉ. मेघना वासनकर यांच्या नेतृत्वात आपली बसच्या सेवा उत्तम रित्या दिली जात आहे. या निर्णयामुळे शहरातील अमरावती रोड आणि हिंगणा रोड या महत्त्वाच्या मार्गांवरील प्रवाशांना मोठा फायदा होणार आहे. विशेष म्हणजे, वडधामणा (अमरावती रोड) ते वानाडोंगरी (हिंगणा रोड) यांना थेट जोडणारी ही पहिलीच सार्वजनिक बस सेवा आहे. त्यामुळे या परिसरातील नागरिक, विद्यार्थी आणि नोकरदार यांची आतापर्यंतची प्रवासाची अडचण दूर होणार आहे.नवीन वेळापत्रक आणि वाढवलेल्या बस सेवेमुळे दैनंदिन प्रवास अधिक सोयीस्कर होईल, तसेच या मार्गावरील रुग्णालये, शाळा, महाविद्यालये आणि रोजगार केंद्रांपर्यंत पोहोचणे अधिक सोपे होणार आहे. या उपक्रमातून नागपूर महानगरपालिका आणि आपली बस शहरातील सार्वजनिक वाहतूक अधिक मजबूत करण्यासाठी आणि नागरिकांना सुरक्षित, विश्वासार्ह आणि परवडणारी बस सेवा वापरण्यास प्रोत्साहन देण्याचा आपला संकल्प पुन्हा अधोरेखित करत आहे.

मनपा आयुक्तांच्या हस्ते मुख्यालयातील 'इंटक' च्या नवीन कार्यालयाचे उद्घाटन

नागपूर, ता.५ :

मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांच्या हस्ते गुरुवारी (ता.५) मनपा मुख्यालय परिसरातील राष्ट्रीय नागपूर कार्पोरेशन एम्प्लाईज असोसिएशन (इंटक) संघटनेच्या नवीन कार्यालयाचे उद्घाटन करण्यात आले. याप्रसंगी अतिरिक्त आयुक्त श्रीमती वसुमना पंत यांच्यासह उपायुक्त श्री.निर्भय जैन, सहायक आयुक्त श्री.श्याम कापसे, मुख्य स्वच्छता अधिकारी डॉ. गजेंद्र महल्ले, इंटकचे अध्यक्ष श्री. सुरेन्द्र टिंगणे, कार्याध्यक्ष



श्री. बाबाराव श्रीखंडे, महासचिव श्री. प्रवीण तंत्रपाळे आणि कोषाध्यक्ष श्री.योगेश बोरकर आदी उपस्थित होते. उद्घाटनप्रसंगी मनपा आयुक्त तथा डॉ. अभिजित चौधरी यांनी कार्यालयाची पाहणी करून संघटनेला शुभेच्छा दिल्या. यावेळी संघटनेचे माजी महामंत्री श्री. रंजन नलोडे, उपाध्यक्ष श्री.अरुण तुर्केल व श्री.सचिन मेश्राम, सेवानिवृत्त कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष श्री.भीमराव मेश्राम, श्री.महेंद्र बोस, श्री.धरमदास मेश्राम, सचिव श्री.विकास सरोदे, श्री. भूपेंद्र तिवारी, श्री. विजय मनघरे, श्री. विनित टेंभुर्णे, श्री.प्रदीप होले, श्री.पुरुषोत्तम कैकाडे, श्री.विजय खोब्रागडे, श्री. विश्वास सेलुकर, श्री.आशुतोष पानतावणे, श्री. रविंद्र बंड, श्रीमती कांचन जुगेल, श्रीमती शितल जांभुळकर, श्रीमती अश्लेषा खोब्रागडे, श्रीमती अल्का मनोरकर, श्रीमती कल्पना रहाटे, श्रीमती मालती जांभुळकर यांच्यासह संघटनेचे अनेक सक्रिय सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

ज्ञानसाधना जिनियस स्कूल वडवणीचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न

मुलींना घडविण्यामध्ये आईची भूमिका खूप महत्त्वाची असते - सपोनि वर्षा व्हगाडे

वडवणी | प्रतिनिधी
येथील ज्ञानसाधना जिनियस स्कूल, वडवणी यांचे वार्षिक स्नेहसंमेलन २०२६ मोठ्या उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी योगेश्वरी सैनिक स्कूल, आंबेजोगाई येथील प्राचार्य श्री.संजय प्रभाकर कुलकर्णी हे होते. प्रमुख पाहुणे म्हणून पोलीस निरीक्षक माननीय श्रीमती वर्षा व्हगाडे मॅडम, गटशिक्षणाधिकारी माननीय श्री. बाबासाहेब उजगरे,आरटीई समन्वयक श्री.बिडकर सर तसेच सामाजिक कार्यकर्ते माननीय बाबरी मुंडे हे उपस्थित होते.या कार्यक्रमास संस्थेचे संस्थापक डॉ.विजयकुमार निपटे सर,मा.अशोक आजबे सर,मा. सुनील कुलकर्णी सर, मा.प्रशांत तोष्णीवाल सर व शाळेच्या संस्थापिका मार्गदर्शिका श्रीमती निपटे मॅडम,श्रीमती आजबे मॅडम,श्रीमती कुलकर्णी मॅडम,श्रीमती तोष्णीवाल मॅडम व प्राचार्य देवराज प्रधान सर यांची प्रमुख उपस्थिती लाभली. मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून वार्षिक स्नेहसंमेलनाचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी संस्थापकांच्या हस्ते उपस्थित मान्यवरांचा सत्कार करण्यात आला.कार्यक्रमात बेस्ट स्टुडन्ट ऑफ द इयर,शंभर टक्के उपस्थिती, क्रीडा क्षेत्रात प्राविण्य मिळवलेले विद्यार्थी, तसेच शैक्षणिक सहल अहवाल लेखनातील गुणवंत विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य देवराज प्रधान सर यांनी केले. संस्थापक अशोक आजबे सर यांनी मनोगत व्यक्त केले. प्रमुख पाहुण्या श्रीमती वर्षा व्हगाडे मॅडम यांनी पालकांनी आपल्या पाल्यांना दर्जेदार शाळांमध्ये शिक्षण देऊन त्यांचे उज्ज्वल भविष्य घडवावे,असे आवाहन केले. गटशिक्षणाधिकारी बाबासाहेब उजगरे यांनी शिक्षणाशिवाय जीवनाला अर्थ नाही, असे प्रतिपादन केले. सामाजिक कार्यकर्ते बाबरी मुंडे यांनी पुणे, मुंबई,बीडसारख्या ठिकाणी इंग्लिश स्कूल असल्या तरी वडवणीसारख्या ठिकाणी दर्जेदार शिक्षण देणारी शाळा उभी राहिली याचा आनंद व्यक्त केला.अध्यक्षीय भाषणात प्राचार्य संजय कुलकर्णी सर यांनी देशसेवा व समाजसेवा हाच शिक्षणाचा खरा उद्देश असल्याचे सांगून संस्थेचे संस्थापक व सहकारी यांचा वृक्षारोपणाच्या माध्यमातून सन्मान केला.ज्ञानसाधना जीनियस स्कूल या शाळेच्या विद्यार्थ्यांनी नाटिका, एकांकिका,गीत व नृत्य सादर करून प्रेक्षकांची मने जिंकली. वडवणी तालुका पत्रकार संघाच्या सर्व पत्रकारांनी कार्यक्रमास उपस्थिती लावून कार्यक्रमाची शोभा वाढवली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भागवत गोंडे सर,विशाखा मॅडम, कु. अमृता मुंडे व कु. किशोरी मस्के यांनी केले.या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेचे संस्थापक, प्राचार्य, शिक्षक-शिक्षिका व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी अथक परिश्रम घेतले. सर्व शिक्षक व शिक्षिकांचा संस्थापकांच्या वतीने सत्कार करण्यात आला. शेवटी 'वंदे मातरम्' ने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.



अखिल भारतीय प्रहार चित्रपट संघटना आयोजित लघुपट पुरस्कार वितरण सोहळा संपन्न.

प्रतिनिधी (कांताभाऊ राठोड)
४ फेब्रुवारी रोजी संध्याकाळी ५ ते ८ यावेळेत अखिल भारतीय प्रहार चित्रपट पुरस्कार सोहळा संकल्प हॉल नवी पेठ येथे माजी राज्यमंत्री मा.बच्चुभाऊ कडू यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला या पुरस्कारासाठी लघुपट चित्रपटांचे २६९ प्रस्ताव आले होते त्यातील १०० चित्रपट निवडण्यात आले व त्यामधून चार पुरस्कार जाहीर करण्यात आले. त्यातील पहिल्या क्रमांकाचे बक्षीस १,००,००० लाख रुपये, दुसऱ्या क्रमांकास ७५,००० हजार रुपये , तिसऱ्या क्रमांकास ५०,००० हजार रुपये व उत्तेजनार्थ प्रत्येकी ५००० रुपये याप्रमाणे पुरस्कार ट्रॉफी व शाल श्रीफळ देऊन



मान्यवराच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. या पुरस्कारासाठी मा.सुहास किर्लोस्कर ,मा.डॉ. अनमोल कोठारी , मा.सौ.अश्विनी धायगुडे कोळेकर यांनी समीक्षक म्हणून काम केले.अखिल भारतीय प्रहार चित्रपट संघटना आयोजित लघुपट पुरस्कार वितरण सोहळ्यासाठी उपस्थित पदाधिकारी मा.संदीप मोहिते पाटील प्रदेश अध्यक्ष मा.संतोष लांडे राज्य संघटक मा.अमित मुळे राज्य संपर्क प्रमुख मा.वेंकटेश कदम राज्य संपर्क प्रमुख सौ.कविता गायकवाड महिला राज्य संपर्क प्रमुख मा.मल्हारी गायकवाड पश्चिम महाराष्ट्र विभाग संपर्क प्रमुख मा.मारुती पोतदार पश्चिम महाराष्ट्र विभाग प्रमुख मा.शैलेंद्र अडसूळ मुंबई विभाग प्रमुख मा.हंसराज पाटील पिंपरी चिंचवड संपर्क प्रमुख व इतर सर्व पदाधिकारी उपस्थित होते.मा.कांताभाऊ राठोड पत्रकार यांना विशेष सहकार्य म्हणून सन्मानित करण्यात आले.हा कार्यक्रम एकदम चांगल्या पद्धतीने पार पडला यावेळी दिग्दर्शक तसेच चित्रपट सृष्टीतील अनेक कलाकार व नागरिक या कार्यक्रमासाठी उपस्थित होते.

संविधानाच्या रक्षणासाठी राष्ट्रवादीच्या उमेदवारांना आरपीआयचा बिनशर्त पाठिंबा !

सातारा (अनिल वीर) : जिल्ह्यामध्ये महायुतीच्या उमेदवारांची चुरस सुरू आहे. भाजप व शिवसेना यांच्या विरोधामध्ये राष्ट्रवादीने (शरद पवार व अजित पवार यांच्या दोन्ही गटांनी) एक आव्हान उभे केले आहे.तेव्हा आरपीआय (ए) ने जाहीर पाठींबा दिला आहे. एकंदर हे दोनच पक्ष धर्मनिरपेक्षक व सामाजिक न्यायाच्या बाजूने लढणारे दिसून येत आहेत.त्यामुळेच रस्त्यावरच्या लढाईबरोबरच सभागृहातील सत्ता असावी. याकरता आम्ही संविधानाच्या रक्षणासाठी राष्ट्रवादीच्या उमेदवारास बिनशर्त पाठिंबा देत आहे.अनेक ठिकाणी मनुवादी व जातीवादी पक्षाने मताची विभागणी व्हावी. म्हणून बौद्ध समाजातील उमेदवारी देण्याचे काम करत आहेत. परंतु अशा गोष्टीला मतदार भुलणार नाहीत. कामेश कांबळे खेड गटातील उमेदवार हे सर्वसामान्य लोकांच्या घरातला उमेदवार असल्यासारखं आहे. आपल्या रक्ताची नाळ जोडलेला उमेदवार म्हणून त्याच्याकडे मोठ्या आशेने लोक पाहत आहेत. जे कोणी उमेदवार आहेत ? त्यांनी सत्ता भोगलेली आहे. परंतु त्यांनी जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या माध्यमातून सत्ता भोगत असताना जनतेच्या हिताचे एकही काम केलेले दिसून येत नाही. जर त्यांनी विकासाचा विकासपुत्र असते तर त्यांना सातत्याने मतदारसंघ बदलण्याची गरज पडली नसती.कुठल्यातरी लोकप्रतिनिधीची हुजरेगिरी करायची.आपला विकास करायचा.हेच धोरण गेल्या दहा पंधरा वर्षात ठेवलेले आहे. आरक्षणाचे खरे रक्षक ही आंबेडकरी समाज आहे. जी लोक शिव फुले शाहू आंबेडकरांचा व अण्णा भाऊ साठे विचार मिटवायला निघालेले आहेत.शिवाय, संविधान संपवायलादेखील निघालेले आहेत. अशा लोकांची हुजरेगिरी करून आपलाच विकासाचा आणि स्वाभिमानी जनतेला प्रस्थापितांच्या दावणीला बांधायचे. विकासाच्या गप्पा मारणाऱ्या विरोधकांनी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या सभागृहाची काय दशा करून ठेवलेली आहे? ही आजी-माजी विरोधक जिल्हा परिषद व पंचायत समितीसाठी आपल्याकडे मतदार मागत आहेत.त्यांच्या पाठीमागे मोठे लोकप्रतिनिधी आहे.शिवाय, ग्रामपंचायतची सत्तासुद्धा विरोधकांच्या हाती आहे. तरीसुद्धा ठोस एकही काम केलं जात नाही. फक्त सत्तेतून स्वतःचा विकास हेच धोरण राबवण्याकरता लोकप्रतिनिधींनी असे उमेदवार लादलेले आहेत.सुज्ञ मतदारांनी आपला जवळचा हे न पाहता आपल्याच विचाराच्या दोन्ही राष्ट्रवादीच्या उमेदवाराबरोबर राहून शरद पवारांचा पुरोगामी विचार व अजितदादा यांचे सामाजि लोकशाही टिकवण्याचा विचार कायमस्वरूपी ठेवत ठेवण्याकरता सर्व रिपब्लिकन पक्षाच्या कार्यकर्त्यांनी मतदान करावे.राष्ट्रवादीचे सर्वची सर्व उमेदवार कसे निवडून येतील? याकडे व लक्ष केंद्रित करावे.असेही पत्रकाद्वारे जाहीर करण्यात आले आहे.सदरच्या पत्रावर प्रदेश सचिव तथा जिल्हाध्यक्ष दादासाहेब ओव्हाळ,पदाधिकारी व कार्यकर्त्या-कार्यकर्ते यांची नावे आहेत.



ज्ञानसाधना जिनियस स्कूल वडवणीचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न

मुलींना घडविण्यामध्ये आईची भूमिका खूप महत्त्वाची असते - सपोनि वर्षा व्हगाडे

वडवणी | प्रतिनिधी
येथील ज्ञानसाधना जिनियस स्कूल, वडवणी यांचे वार्षिक स्नेहसंमेलन २०२६ मोठ्या उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी योगेश्वरी सैनिक स्कूल, आंबेजोगाई येथील प्राचार्य श्री.संजय प्रभाकर कुलकर्णी हे होते. प्रमुख पाहुणे म्हणून पोलीस निरीक्षक माननीय श्रीमती वर्षा व्हगाडे मॅडम, गटशिक्षणाधिकारी माननीय श्री. बाबासाहेब उजगरे,आरटीई समन्वयक श्री.बिडकर सर तसेच सामाजिक कार्यकर्ते माननीय बाबरी मुंडे हे उपस्थित होते.या कार्यक्रमास संस्थेचे संस्थापक डॉ.विजयकुमार निपटे सर,मा.अशोक आजबे सर,मा. सुनील कुलकर्णी सर, मा.प्रशांत तोष्णीवाल सर व शाळेच्या संस्थापिका मार्गदर्शिका श्रीमती निपटे मॅडम,श्रीमती आजबे मॅडम,श्रीमती कुलकर्णी मॅडम,श्रीमती तोष्णीवाल मॅडम व प्राचार्य देवराज प्रधान सर यांची प्रमुख उपस्थिती लाभली. मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून वार्षिक स्नेहसंमेलनाचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी संस्थापकांच्या हस्ते उपस्थित मान्यवरांचा सत्कार करण्यात आला.कार्यक्रमात बेस्ट स्टुडन्ट ऑफ द इयर,शंभर टक्के उपस्थिती, क्रीडा क्षेत्रात प्राविण्य मिळवलेले विद्यार्थी, तसेच शैक्षणिक सहल अहवाल लेखनातील गुणवंत विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य देवराज प्रधान सर यांनी केले. संस्थापक अशोक आजबे सर यांनी मनोगत व्यक्त केले. प्रमुख पाहुण्या श्रीमती वर्षा व्हगाडे मॅडम यांनी पालकांनी आपल्या पाल्यांना दर्जेदार शाळांमध्ये शिक्षण देऊन त्यांचे उज्ज्वल भविष्य घडवावे,असे आवाहन केले. गटशिक्षणाधिकारी बाबासाहेब उजगरे यांनी शिक्षणाशिवाय जीवनाला अर्थ नाही, असे प्रतिपादन केले. सामाजिक कार्यकर्ते बाबरी मुंडे यांनी पुणे, मुंबई,बीडसारख्या ठिकाणी इंग्लिश स्कूल असल्या तरी वडवणीसारख्या ठिकाणी दर्जेदार शिक्षण देणारी शाळा उभी राहिली याचा आनंद व्यक्त केला.अध्यक्षीय भाषणात प्राचार्य संजय कुलकर्णी सर यांनी देशसेवा व समाजसेवा हाच शिक्षणाचा खरा उद्देश असल्याचे सांगून संस्थेचे संस्थापक व सहकारी यांचा वृक्षारोपणाच्या माध्यमातून सन्मान केला.ज्ञानसाधना जीनियस स्कूल या शाळेच्या विद्यार्थ्यांनी नाटिका, एकांकिका,गीत व नृत्य सादर करून प्रेक्षकांची मने जिंकली. वडवणी तालुका पत्रकार संघाच्या सर्व पत्रकारांनी कार्यक्रमास उपस्थिती लावून कार्यक्रमाची शोभा वाढवली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भागवत गोंडे सर,विशाखा मॅडम, कु. अमृता मुंडे व कु. किशोरी मस्के यांनी केले.या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेचे संस्थापक, प्राचार्य, शिक्षक-शिक्षिका व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी अथक परिश्रम घेतले. सर्व शिक्षक व शिक्षिकांचा संस्थापकांच्या वतीने सत्कार करण्यात आला. शेवटी 'वंदे मातरम्' ने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.



माणसांना खेचून आणण्याची कला धम्म शिकवते !

सातारा : बुद्ध विचार बाबासाहेब यांनी आपणास धम्म दिला आहे.तेव्हा खेचून आणण्यासाठी शिकवण मिळत असते.असे प्रतिपादन सुरेश तथा आबा मुळीक यांनी केले. फत्यापुर ,ता.सातारा येथे कालकथीत संजय विठ्ठल कांबळे यांच्या पुण्यानुमोदन कार्यक्रमात आदरांजलीपर मुळीक बोलत होते.ते पुढे म्हणाले,"संजय भाऊंनी धम्मानुसारच माणसं जवळ केली होती.तेव्हा सुखी व्हायचे असेल तर इतरांना मदतीचा हात देऊन मार्गक्रमण केले पाहिजे." अनिल वीर म्हणाले,"सध्या सर्व सुविधा मिळत असल्याने मानवाचे आयुर्मान वाढत आहे. तेव्हा चांगले जीवन धम्मानुसार साकार केले पाहिजे.जीवन जगत असताना चुका दुरुस्त करीत वाटचाल करावी.तरच जीवन सार्थकी लागेल." "धम्माच्या विचारानुसार वाटचाल करताना अंधश्रध्दा नष्ट केली पाहिजे.पती निधननानंतर सौन्दर्य असणारे कुंकू व मंगळसूत्र काढू नये. अशाप्रकारच्या रूढ असणाऱ्या गोष्टींना मूठमाती देऊन परिवर्तन घडवले पाहिजे." अशायाचे मार्गदर्शन विधिकार बौद्धाचार्य कुमार सुर्वे व केंद्रीय शिक्ष गौतम कांबळे यांनी विविध उदाहरणाद्वारे केले. यावेळी रिपाई ग्रामीण जिल्हाध्यक्ष संजय गाडे,सीमा मोतलिंग,आकाश कांबळे आदींनी आदरांजलीपर मनोगत व्यक्त केली.प्रथमतः डॉ.गौतम विठल कांबळे व कांबळे परिवार यांनी कालकथीत कांबळे व महापुरूष यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. सदरच्या कार्यक्रमास चंद्रकांत कांबळे,सुहास मोरे,ऍड. विलास वहागावकर, अनिकेत,प्रीतम व रोहित कांबळे,ग्रामस्थ, नातेवाईक, उपासक व उपासिका मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.



कालकथीत संजय कांबळे व महापुरूष यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करताना मान्यवर